|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ | अंक : १२ | सोमवार दि. ११ मार्च २०२४ ते रविवार दि. १७ मार्च २०२४ | पाने : ८ | किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## संसारातला शुल्लक वाद विकोपला गेला चिडलेल्या पतीने अखेर पत्नीचा खून केला



बोईसर/क्राईम रिपोर्टर

संसार म्हटला की त्यात पती व पत्नीमध्ये कोणत्या ना कोणत्या कारणावरून वाद होतच असतात. पण हे वाद दोन्ही कडच्या जाणत्या माणसांनी मिटवायचे असतात आणि जर का हे वाद मिटले नाहीत तर त्यातून काहीही घडू शकते. कारण अशा वादांतूनच माणसाच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि माणूस एकदा का चिडला की तो कोणत्याही ...पान २ वर

## सौंदर्यवती मामीला पाहून भाचा वासनेने पेटला शरीरसुखाला नकार देताच तिचा जीव घेतला









नाशिक/क्राईम रिपोर्टर

आजकल समाजामध्ये व्यभिचार इतका वाढला आहे की वासनांध लोक नात्यागोत्याचा सुद्धा विचार करीत नाहीत. पूर्वी कुटुंबातील महिलांच्या कुल शिलाच्या रक्षणार्थ कुटुंबातील पुरुष एखाद्याचा जीव घ्यायला किंवा स्वतःचा जीव द्यायलाही मागेपुढे पाहात नव्हते. त्यामुळे घरातल्या महिला आणि नातीगोती चार भिंतीच्या आत सुरक्षित होती. पण आता मात्र कुटुंबातील पुरुषांचीच नजर विखारी बनलेली असल्याने कुटुंबातील लेकिबाळी घरातल्याच पुरुषांच्या वासनेची शिकार बनत आहेत. कधी दीर वहिनीच्या अब्रुवर हात टाकतोय तर कधी जन्मदाता बाप पोटच्या पोरीवर वाइट नजर ठेवतोय. त्यामुळे रक्ताच्या नात्याला डाग लावला जातो. परिणामी महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिकच गंभीर बनत चलला आहे. हे जर का असेच चालू राहिले तर कुटुंबातील माता–भगिनींच्या अब्रुचे रक्षण करणारा कुणीच राहणार नाही. एकीकडे बाहेर नाक्यानाक्यावर वासनांध लांडगे महिलांना पाहून त्यांची शिकार करण्यासाठी टपलेले असतात, तर दुसरीकडे घरातले पुरुषही लंपट बनून आपल्याच रक्ताच्या नात्यातील महिलांच्या अब्रुवर दरोडा टाकायला टपलेली असतात. अशावेळी त्या महिलेने कोणाकडे मदतीसाठी पदर पसरावा? कोणाकडे अब्रुच्या रक्षणाची भिक मागवी? हे सर्व पाहिल्यावर आता महिलांनी स्वतःच्या अब्रुचे स्वतःच रक्षण करण्यासाठी मनाची तयारी हवी, तरच त्या सुरक्षित राहु शकतील. त्याचबरोबर घरातील पुरुषांची नजर ओळखून सावध असायला हवे अन्यथा घात होवू शकतो. नाशिक रोड येथे अशाच एक घटनेत आपल्या मामा–मामी सोबत राहणाऱ्या भाच्याची मामीवर वाईट नजर होती. तो तिच्याकडे शरीरसुखाची मागणी करीत होता. पण तिने नकार देताच त्याने मामीची हत्या केली व आपले पाप लपवण्यासाठी स्वतःवरही चाकुचे वार करुन घेतले. जेणेकरून मामीला दुसऱ्यानेच कुणी तरी मारले व त्याने आपल्यावरही हल्ला केला हे दाखवण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी सत्य शोधून काढले आणि या प्रकरणाला वाचा फोडून आरोपी भाच्याला अटक केली.

पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या तक्रारीमध्ये अज्ञात व्यक्तीने या महिलेची हत्या करुन आरोपीच्या गळ्यावर चाकूने वार केल्याचं मयत महिलेच्या पतीने म्हणजेच आरोपीच्या मामाने म्हटलं होतं. त्याच दिशेने आधी तपास सुरु झाला. नाशिकमध्ये मामा–भाच्याच्या नात्याला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. ६ मार्च रोजी नाशिक रोड भागात राहत्या घरात एका महिलेची हत्या झाल्याच्या प्रकरणामध्ये धक्कादायक खुलासा पोलीस तपासात समोर आला आहे. मामीकडे शरीरसुखाची मागणी केल्यानंतर तिने नकार दिल्याने भाच्यानेच मामीची निघृण हत्या केल्याचं उघड झालं असून यासंदर्भातील माहिती पोलिसांनी दिली आहे. नाशिक रोड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामदास शेळकेंनी यासंदर्भातील सविस्तर माहिती शुक्रवारी प्रसारमाध्यमांना दिली.

६ मार्च २०२४ रोजी एकलहरे औष्णिक विद्युत केंद्राजवळ जगताप मळा परिसरामध्ये ही घटना घडली आहे. मयत महिलेचे नाव कांती सुदाम बनेरीया असं आहे. कांती या केवळ २७ वर्षांच्या होत्या. कांती या त्यांच्या पतीला पाणीपुरी आणि भेळपुरी विकण्याच्या व्यवसायामध्ये हातभार लावायच्या, असं शेळकेंनी सांगितलं. एकलहरे परिसरात राहणारं बनेरीया कुटुंब हे हातावर पोट असलेलं कुटुंब आहे, असंही शेळकेंनी नमूद केलं. कांती आणि त्यांच्या पतीबरोबर मागील ७ ते ८ महिन्यांपासून पती सुदामचा भाचा अभिषेक सिंह राहत होता. अभिषेक हा ...पान २ वर

## वहिनीबरोबरचे भांडण जीवघेणे ठरले बहिणीच्या दिराला भावाने ठार मारले



जत/क्राईम रिपोर्टर

**माणसाचे वेळेवर लग्न झाले नाही की त्याची मानसिक स्थिति बिघडते. जतमध्ये राहणाऱ्या अविनाश याचे सुद्धा असेच झाले होते. त्याला घर विकून लग्न करायचे होते. पण विधवा वहिनी त्याला घर विकायला देत नव्हती. त्यामुळे दोघांची नेहमी भांडणे व्हायची. एकदा अविनाशने दारूच्या नशेत वहिनीला मारहाण करून तिचे सामान बाहेर फेकताच त्यांच्या गावात राहणारा तिचा भाऊ किशोर चिडला आणि त्याने मित्रांच्या मदतीने अविनाशची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.**




जत शहरातील विठ्ठलनगर येथे अविनाश कांबळे हा रहायला आहे. तो एका खाजगी बसवरती क्लिनर म्हणून काम करीत असे. बसवर काम नसेल त्यावेळी तो मिळेल ते काम करीत होता. त्याचे वय ३० वर्ष होत आले तरी त्याचे अदयाप लग्न झाले नव्हते. त्याच्या आई वडिलांचे ही बऱ्याच वर्षापूर्वी निधन झाले असल्याने तो वेगळाच राहत होता.बाजुलाच त्याची वहिनी आपल्या मुलाबरोबर राहत होती. त्याच्या मोठया भावाने गेल्या तीन वर्षापूर्वी गळफास घेऊन आत्महत्या केल्याने त्याची वहिनी ही एकाकी पडली होती. अविनाश कांबळे याचे वडिलार्जीत घर होते. त्या घरात वहिनी राहत होती. त्या घराची अदयाप वाटणी झालेली नव्हती. त्यामुळे अविनाश हा वहिनीबरोबर सारखा वाटणी करा म्हणून भांडण काढत होता. जर तुम्ही वाटणी देणार नसाल तर घरातून बाहेर पडा अशी धमकी तो तिला देत होता. रोज दारू पिऊन आला की, दारूच्या नशेत तो तिला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करीत माझे घर, माझी जागा बळकावून बसल्या असे म्हणून तो तिच्या अंगावर ही तिला मारहाण करायला ही जात होता. वहिनीचा सख्खा चुलत भाऊ किशोर बामणे हा देखील त्याच्या शेजारीच जवळच राहयला होता. त्याला अविनाश हा आपल्या बहिणीला त्रास देत असल्याचे ...पान २ वर

## संशय आल्याने प्रियकराने तिचा घात केला मोबाईलवरील चॅटींगमुळे प्रेयसीचा जीव गेला






नाशिक/क्राईम रिपोर्टर

**प्रेम हे दोन अक्षरी शब्द विश्वासाच्या अतूट धाग्यात गुंफलेले असतात. पण जेंव्हा या विश्वासाला कुठे तरी तडा जातो तेंव्हा मात्र प्रेमाची जागा सुडाच्या भावनेने घेतलेली असते. मुळ नंदुरबारचे रहिवाशी असलेले सागर आणि प्रियंका शिक्षणासाठी नाशिकमध्ये रहात होते. पण प्रियंका रात्रभर कोणाशी तरी मोबाईलवर चॅटींग करते याचा सागरला राग आणि संशय होता. त्यावरून दोघांची भांडणे होऊ लागली आणि एके रात्री अशाच भांडणातून सागरने प्रियंकाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सागरला अटक केली आहे.**

तारूण्यात प्रेम जमणे हे स्वाभाविक आहे, पण प्रेम जपण्यासाठी एकमेकावर विश्वास असणे, एकमेकाशी प्रामाणिक असणेही गरजेचे असते. तारूण्याच्या जोशात काही वेळा संशयाचे वातावरण तयार होते. एखाद्या मुलीला प्रियकर असला तरी अन्य ...पान २ वर

## बायल्या मित्राला शरीर सुखासाठी त्याने छळले मृत्यूने कधी गाठले भगवानला नाही कळले





सातारा/क्राईम रिपोर्टर

**एखाद्या माणसाचा बायकी स्वाभाव असतो. त्यामुळे काही लोक त्याला समलिंगी समजतात. पण प्रत्यक्षात तसे नसते. कारण बायकी स्वभावाचा प्रत्येक माणूस काही समलिंगी नसतो. सुशांत साळूंखे हा सुद्धा असाच होता. पण त्याचा मित्र भगवान मात्र त्याच्याकडे त्याच नजरेने बघायचा. भगवानला सुशांत कडून ते सुख हवे होते, पण सुशांत तयार नव्हता. त्यामुळे तो मित्र असूनही सुशांतला बायल्या म्हणून हिणवायचा. त्यामुळे सुशांत चिडला होता आणि भगवानला धडा शिकवायचा त्याने निर्णय घेतला. एक दिवस त्याने भगवानला आपण त्या कामासाठी आहोत असे सांगितले आणि त्याला शेतात बोलावून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी सुशांतला अटक केली आहे.**

भगवान सकपाळ हा तरूण एका दवाखान्यात काम करीत असताना त्याची ओळख गावातीलच सुशांत साळुंखे याच्याबरोबर झाली. ते दोघे ही चांगले मित्र बनले. त्या दोघांची उठबस सुरू झाली. सुशांत हा बाईकी स्वभावाचा असल्याचे भगवान याच्या लक्षात आले. तो सुशांत बरोबर सेक्स विषयी बोलत असायचा. कधी कधी भगवान हा त्याच्या बाईकी स्वभावावरून त्याची खिल्ली उडवित होता. दोघे ही तरूण आणि एकाच वयाचे असल्याने भगवान हा त्याला सेक्स करण्यासाठी प्रवृत करू लागला. सुरूवातीला मित्र म्हणून सुशांत याने त्याच्या बोलण्याकडे खिल्ली उडविण्याकडे लक्ष दिले नाही. परंतु जस जसे दिवस जात होते तस तसे भगवान हा त्याला त्या त्या कामासाठी टार्चर करू लागला. याचा राग सुशांतला येत होता. त्याने त्याला ...पान २ वर

## माता अशी कशी बरे वैरिणी झाली मुलांचा जीव घेऊन आत्महत्या केली



सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

**माणसाच्या मनातले सहसा कोणाला ओळखता येत नाही. कारण वरुन नॉर्मल वाटत असला तरी त्याच्या मानत काय चालले आहे ते कळत नाही. सोलापुरच्या एमआयडीसीमधील सरवदेनगरात एका महिलेने आपल्या दोन मुलांना ठार मारून स्वतःही आत्महत्या केली. एक जन्मदाती माता इतके टोकाचे पाऊल कसे उचलू शकते याचेच लोकांना आश्चर्य वाटतेय. या प्रकरणी पोलीस मयत महिलेच्या पतीची चौकशी करीत आहे.**

सोलापूर येथील मुळेगाव रस्त्यावरील सरवदेनगरात दोन अपत्यांसह आईने आपल्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना रविवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. स्नेहा संतोष चिल्लाळ (वय ३०) तिची मुलगी संध्या संतोष चिल्लाळ (वय ११) आणि मुलगा मनोजकुमार संतोष चिल्लाळ (वय ७) अशी मृतांची नावे आहेत. ...पान ६ वर

## तीन हजारावरून दोघांमध्ये वाद झाला चिडलेल्या किरणने मित्राचा खून केला

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर



मयत गौरव

**मित्राच्या हातून जर एखादी चूक झाली तर मित्राने त्याला माफ करायचे असते. पण राहाता शहरात राहणाऱ्या दोन मित्रांमध्ये बाईकच्या सेल्फ स्टारटरवरून वाद झाला. हा वाद इतका विकोपला गेला की किरणचा मित्र गौरव त्याच्याकडे ३ हजार रूपये मागू लागला. त्यामुळे किरण भयंकर चिडला आणि त्याने रागाच्या भरात गौरव याला दारू प्यायला बोलवले आणि दारू पाजून त्याला ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**






आरोपी किरण

मैत्री झाली की लोक एकत्र येतात. गप्पा–गोष्टीत रमतात. एकमेकाबद्दल त्यांना आपुलकी वाटू लागते. एकमेकाकडे जाणे–येणे वाढते. व्यसन असेल तर एकत्र पार्त्या होऊ लागतात. एकमेकाच्या अडचणीत पैसे वा एखादी वस्तू देणे–घेणेही सुरू होते. त्यानंतर मात्र व्यवहार नीटपणे सांभाळण्याची गरज असते. अन्यथा मैत्रीत वितुष्ट आल्याशिवाय रहात नाही. मग किरकोळ कारणातूनही मित्र शत्रू बनतात. एकमेकाच्या जीवावर उठतात. बाईकचा स्विच खराब केला या किरकोळ कारणावरून दोन मित्रात वाद सुरू झाला. माझ्या गाडीचा स्विच खराब केलास तो दुरूस्त करून दे असे म्हणणाऱ्या गौरवला त्याचा मित्र किरणने कायमचेच संपवले. अहमदनगर जिल्ह्यातील राहाता शहर परिसरातील गौरव पंडीत शिरसाठ (वय ३०) ...पान ६ वर

## मित्राच्या पत्नीवर वाईट नजर ठेऊन फसला स्त्रीलंपट भीमसेन अखेर जीव गमावून बसला

मुंबई/एस.कुमार



**मैत्रीत मिठाचा खडा पडला की मैत्री तूटायला वेळ लागत नाही. त्यासाठी मैत्रीचे नाते जपताना दोन्ही मित्रांनी मर्यादा पाळायच्या असतात. एकमेकांच्या कुटुंबाविषयी आदर बाळगायचा असतो. पण काही मित्र असे असतात की त्यांची मित्राच्या कुटुंबातील महिलांवर वाईट नजर असते. भीमसेन भालेराव हा सुद्धा त्यापैकीच एक होता, त्याची त्याचा मित्र रोहित खारपे याच्या पत्नीवर वाइट नजर होती. हा प्रकार रोहितच्या नजरेत येताच दोघांमध्ये वाद सुरू झाला. आपल्या पत्नीकडे वाइट नजरेने बघणाऱ्या भीमसेन याला जीवंत ठेवायचे नाही असा विचार करून ऐके दिवशी रोहितने भीमसेनला दारू पाजली आणि त्याची हत्या केली. याप्रकरणी आरोपी रोहितला पोलिसांनी अटक केली आहे.**

दिनांक ८ मार्च २०२४ रोजी पहाटे ४:३० वाजताच्या सुमारास चेंबूरच्या टिळकनगर पोलीस ठाणे हद्दीत एक व्यक्ती रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याची माहिती टिळकनगर पोलिसांना मिळाली. ही माहिती मिळताच टिळकनगर पोलीस ठाणेचे वपोनि दिपक बागुल, पोलीस निरीक्षक विक्रम बनसोडे ...पान ६ वर

## संपत्तीची हाव श्रीकांतच्या अंगाशी आली वहिनीची हत्या केल्यामुळे जन्मठेप झाली



वसई/क्राईम रिपोर्टर

**संपत्तीचे वाद भयंकर असतात. ते जर लवकर भेटले नाहीत तर लोक रक्ताची नाती ही ओळखत नाहीत आणि आपल्याच नात्यातील माणसाचा जीव घ्यायला ही मागे पुढे बघत नाहीत. विरारमध्ये अशाच एका घटनेत, घर नावावर करण्याच्या वादातून दिराने स्वतःच्या वहिनीचा खून केला होता. याप्रकरणी न्यायालयात सुनावणी होऊन दिराला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे.**



घराच्या मालकीवरून झालेल्या वादातून सख्ख्या वहिनीची हत्या करणाऱ्या दिराला वसई सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. २०१८ मध्ये विरार मध्ये ही घटना घडली होती. याप्रकरणी पोलिसांनी सादर केलेले भक्कम पुरावे, साक्षीदारांची साक्ष महत्वपूर्ण मानून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले. विरार पूर्वेच्या आंबेडकर नगर मधील अण्णा पाडा येथे शशिकांत गुंडाळे उर्फ कांबळे (३६) हा पत्नी आरती (३२) हिच्या सोबत रहात होता. ते घर त्याची आई लक्ष्मी हिच्या नावाने होते. घराच्या मालकीवरून शशिकांत आणि त्याचा भाऊ श्रीकांत गुंडाळे यांच्यात वाद झाला होता. आई लक्ष्मीच्या मृत्यूनंतर श्रीकांतने परस्पर घर स्वतःच्या नावाने करून घेतले होते आणि ...पान ६ वर

**पान १ वरून...**

## संसारातल्या शुल्लक वाद विकोपला...

थराला जातो. बोईसरमध्ये राहणाऱ्या कृताली व कनिष्क या पाटील दांपत्यामध्ये असाच वाद होता. या वादातून दोघांची नेहमी भांडणे व्हायची आणि ऐके दिवशी हा वाद इतका विकोपला गेला की कनिष्कने कृतालीची गळा दाबून हत्या केली व सासऱ्यावर हत्येचा आरोप केला. मात्र पोलिसांनी त्याचा हा बनाव हाणून पाडला आणि त्याला अटक केली. प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली. घरगुती वादातून पतीने आपल्या पत्नीची गळा दाबून हत्या केल्याची धक्कादायक घटना बोईसर-दांडीपाडा परिसरात घडली आहे. कृताली पाटील असे या घटनेतील मृत महिलेचं नाव असून या प्रकरणी आरोपी पतीला बोईसर पोलिसांनी अटक केली आहे. पालघर तालुक्यातील बोईसर-दांडीपाडा परिसरात कनिष्क पाटील व कृताली पाटील हे दाम्पत्य वास्तव्यास होते. कृताली ही कुरिअर कंपनी व कनिष्क हा चारचाकी वाहनाचे गॅरेज चालवत होता. या दोघा पती-पत्नीमध्ये वारंवार किरकोळ करणावरून नेहमी वाद, भांडण होत असे. दोघांमधील या वादामुळे दोघे पती-पत्नी एकमेकांशी कधी महिनाभर कधी चार-पाच महिने बोलत नसत. शनिवारी रात्रीच्या सुमारास या दोघा पती-पत्नीमध्ये किरकोळ कारणावरून पुन्हा वाद झाला. यावेळी रागाच्या भरात पती कनिष्क पाटील याने पत्नी कृताली पाटील हिच्या गळा दाबून हत्या केली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी स्वतः बोईसर पोलीस ठाण्यात जाऊन माझी पत्नी सकाळी झोपेतून उठली नसून ती मृत झाल्याबाबत माहिती दिली. त्याचप्रमाणे दोघांमध्ये होणाऱ्या सततच्या वादामुळे कृतालीच्या वडिलांनीच तिची हत्या केल्याचा संशय घेत फिर्याद दाखल केले. बोईसर पोलिसांनी त्यानंतर घटनास्थळी दाखल होत घटनास्थळाची पाहणी व याबाबत चौकशी केली. यावेळी कनिष्का पाटील हिच्या गळ्यावर लालसर डाग असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी तिचा मृतदेह शवविच्छेदनासठी तारापूर प्राथमिक केंद्र आरोग्य येथे पाठवला. शवविच्छेदन अहवालात गळा दाबून सदर महिलेची हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी मृत महिलेचा पती कनिष्क याची कसून चौकशी केली असता, सतत होणाऱ्या वाद व भांडणांमुळे आपणच पत्नीची हत्या केल्याची कबुली पती कनिष्क पाटील याने पोलिसांना दिली आहे. या जोडप्याने २०१७ मध्ये प्रेमविवाह केला होता. ते वेगवेगळ्या जातीचे होते. आरोपीचं बोईसर येथील पास्थल येथे गॅरेज आहे. तिथे तो चारचाकी वाहनांची दुरुस्ती करतो. तसंच आरोपी एका राजकीय पक्षाचा स्थानिक कार्यकर्ता आहे. आरोपीला अटक करण्यात आली. त्यानंतर न्यायालयाने आरोपीला पोलीस कोठडी सुनावली आहे. या दाम्पत्याला साडेचार वर्षांचा मुलगा आहे.

## सौंदर्यवती मामीला पाहून भाचा ...

मूळ गावी येऊन जाऊन नाशिकमधील आपल्या मामाच्या घरी राहत होता. काही दिवसांपूर्वी तो इथे राहायला आला होता. तो सुद्धा पाणीपुरीच्या व्यवसायामध्ये होता, अशी माहिती पोलिसांनी प्रसारमाध्यमांना दिली. कांती यांची हत्या झाली त्यावेळी घरात असलेल्या अभिषेकवरही अज्ञात व्यक्तीने वार केल्याचा दावा करण्यात आला. अभिषेकच्या गळ्यावरही वार करण्यात आले होते, असं पोलिसांकडे दाखल केलेल्या तक्रारीमध्ये म्हटलं होतं. भाचा अभिषेकने दिलेल्या माहितीच्या आधारे मयत कांतीचे पती सुदाम यांनी पोलीस स्टेशनमध्ये लेखी तक्रार दाखल केली. या तक्रारीनुसार, अज्ञात इसमाने पत्नीची हत्या करुन भाच्याच्या गळ्यावर चाकूने हल्ला केल्याचं सुदाम यांनी म्हटलं होतं. पोलिसांनी परिस्थितीजन्य पुरावा आणि केलेल्या तक्रारीमधील घटनाक्रम जुळवून खात्री करुन घेण्याचा प्रयत्न केला. मात्र कोणताही अज्ञात इसम या ठिकाणी आलेला नव्हता असं पोलिसांच्या तपासात समोर आलं, असं शेळकेंनी सांगितलं. पोलिसांनी तपास अन्य मार्गाने सुरु केला. पोलिसांनी कांती, सुदाम आणि अभिषेक या तिघांचेही मोबाईल रेकॉर्ड्स तपासले. परिस्थितीजन्य पुरावे आणि इतर माहिती पोलिसांनी गोळा केली. या तपासात असं निष्पण्ण झालं की कांतीचा भाचा अभिषेक हा तिच्याकडे अनैतिक संबंधांसाठी (शरीरसुखाची) सातत्याने मागणी करायचा. मात्र कांती त्याच्या या मागणीकडे दुर्लक्ष करायची. यातूनच कांती आणि अभिषेकमध्ये वाद झाला होता. याच मुळ वादातून रोज वेगवेगळ्या गोष्टींचं निमित्त काढून या दोघांमध्ये वाद व्हायचे. त्यामुळेच अभिषेकला घरातून कायमचं हकलवून लावण्याचा कांतीचा विचार होता. यासंदर्भातील चाहूल अभिषेकला लागली. त्यामुळेच त्याने स्वत:च्या मामीची हत्या केली, असं पोलिसांनी सांगितलं आहे. आपणच मामीची हत्या केली आहे हे उघडकीस येऊ नये म्हणून अभिषेकने स्वत:च्या गळ्यावर वार करुन घेतले आहेत. तो स्वत: गुन्हा लपवण्याच्या प्रयत्नात गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर सध्या उपचार सुरु आहेत, असं शेळके म्हणाले. पोलिसांची त्याच्यावर नजर असून तो बरा झाल्यानंतर त्याच्याविरोधात कायदेशीर कारवाईला सुरुवात होईल असं पोलिसांनी सांगितलं.

## वहिनीबरोबरचे भांडण जीवघेणे ...

माहिती होते. त्याने व शेजारीच राहणाऱ्या पै पाहुण्यांनी ही अविनाश याला या कारणातून समज देऊन वहिनीला त्रास देवू नकोस असे सांगितले होते. परंतु त्याच्या सांगण्याचा अविनाशवर काहीच परिणाम झाला नाही. एक तर ते वडिलार्जीत घर लहान असल्याने एका कुटूंबापुरते होते. अविनाशच्या मोठया भावाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने त्या घरात वहिनी ही आपल्या मुलासह राहयला होती. ती ही मिळेल ते काम करून आपल्या मुलाचा सांभाळ करीत होती. कसेबसे आपल्या संसाराचा राहट गाडा चालवित असल्याने ती नवऱ्याचे घर सोडायला तयार नव्हती.तर दुसरीकडे अविनाश याचे वय झाले तरी लग्न ठरत नव्हत. याला कारण ही तसेच होते. एक तर राहयला घर नाही, जमीन नाही आणि दुसरे म्हरजे तो दारूच्या व्यसनात जास्तच गुरफटला होता. पण तो आपली चुक मान्य करायला तयार नव्हता. त्याला आपल्या वडिलार्जीत घरात वाटणी पाहिजे होती.घर मिळाले की लग्न होईल असे त्याला वाटत होते. त्यासाठी तो धडपडत होता. वहिनी आणि दीर हे दोघे ही आपआपल्या परीने बरोबर होते. वहिनीला ही वाटत होते की आपल्या दीराचे लग्न व्हावे त्याने ही सुखाचा संसार करावा परंतु त्याला काम धंदा नव्हता. त्यातच तो दारूच्या व्यसनात अडकल्याने त्याचे लग्न ठरत नव्हते.त्याला ती बिच्चारी तर काय करणार होती. अविनाश हा सांगून ही ऐकत नव्हता. त्याला फक्त वडिलार्जी घर दिसत होते. त्यासाठी तो दारू पिऊन आला की वहिनीला शिव्या देत बसायचा मला माझी वाटणी दया नाही तर तुम्ही घरातून बाहेर पडला असे सांगत होता. दीर भावजेयची भांडणे ही शेजाऱ्यांना नवीन नव्हती.ते ही त्याच्या भांडणाला वैतागलेले होते. त्यातच वहिनीचा भाऊ किशोर बामणे याने अविनाश याला तु माझ्या बहिणीला त्रास देवू नकोस नाही तर त्याचे परिणाम गंभीर होतील अशी धमकी दिली. त्याच्या या धमकीकडे अविनाश याने दुर्लक्ष केले.तुला काय करायचे कर असे म्हणून त्याने किशोर याला तु माझ्या घरच्या भांडणात पडू नकोस असे सांगितले. हल्ली अविनाश याला कामधंदा मिळाला नसल्याने तो दिवसभर दारू पिऊन घरात रहात होता.बुधवार दि. ६ मार्च रोजी तो सकाळपासून फुल्ल दारूच्या नशेत होता. सकाळ सकाळीच त्याने वाटणीच्या विषयावरून वहिनीबरोबर भांडण काढून तिला मारहाण करीत तिचे सामान घरातून बाहेर फेकले. ही माहिती किशोर याला समजताच तो आपल्या बहिणीच्या घराकडे आला. त्यावेळी किशोर बरोबर झालेल्या भांडणात अविनाश याने किशोरच्या दुचाकी गाडीचा आरसा रागरागाने फोडला आणि त्याच्या गाडीवर दगड घालायचा प्रयत्न केला. ही गोष्ट किशोरच्या मनाला खटकली.त्याने अविनाशला मारहाण केली.काही वेळाने भांडण शांत झाल्यावर किशोर तेथून निघून गेला. भांडणाचा राग अविनाशच्या डोक्यात शिरला होता.तो परत दारूच्या गुत्यावर दारू पिण्यासाठी गेला. दुपारी १२.३०ते १च्या दरम्यान तो दारूच्या नशेत विजापुर गुहागर माहामार्गावरील सोलनकर चौकातून एकटाच चालत चालला होता. उन्हाचा कडाका जास्त असल्याने चौकात तशी गर्दी कमी होती.तो चालत आपल्या घराकडे चालला असताना किशोर बामणे हा आपले मित्र सोनु संके, विजय कांबळे आणि आंनदा कांबळे यांना घेऊन दोन दुचाकी गाडीवरून अविनाश याचा पाठलाग करीत आला. अविनाश हा भर चौकात आल्यावर दुचाकीवरून येणाऱ्या किशोर याने अविनाश याच्या मानेवर आपल्या कडील तलवारीने जबर वार केला. अविनाश याच्या मानेतून रक्ताची चिळकांडी उडाली. तो ओरडतच रस्त्यावर पडला.त्याच वेळी सोनू संके याने बाईकवरून उतरत परत एकदा तलवारीने अविनाशच्या छातीवर वार केले. त्या पाठोपाठ आलेल्या विजय कांबळे आणि आंनदा कांबळे यांनी ही सोनूकडून तलवार घेऊन अविनाशवर वार केले. अविनाश याच्यावर त्यांनी तब्बल १२ वार केले. त्यांनी केलेल्या वारात अविनाश हा जागीच मृत्युमुखी पडला. अविनाश याला मारून किशोर याने घटनास्थळावरून आपल्या मित्रासह पळ काढला. भर चौकात खूनाची घटना घडल्यावर चौकातील लोक सैरभैर पळू लागले.तर काहीनी घटनास्थळी गर्दी केली. कुणी तरी या घटनेची माहिती जत पोलीसांना दिल्यावर पोलीस ही सोलनकर चौकातील घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी घटनास्थळाचा आणि मयताचा पंचनामा करून तपासाला सुरूवात केली. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी भेट देऊन घटनेची माहिती घेतली. मयताची ओळख पटवून घटनास्थळी मयताच्या नातेवाईकांना बोलावून घेतले. त्याच्याकडून या घटनेची माहिती घेतल्यावर ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याचा अंदाज पोलीसांना आला. त्याचबरोबर घटनास्थळाच्या परिसरातील सीसीटीव्हीच्या फुटेजची पाहणी केली असता त्यांना दोन दुचाकीवरू चार जण येवून मयत अविनाश कांबळेवर तलवारीने वार करीत असल्याचे दिसत होते. घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जत येथील सरकारी रुग्णालयात पाठवून देण्यात आला. घटनास्थळावरून संशयीत आरोपी पळून गेले असल्याने त्याचा शोध घ्यायला पोलिसांनी सुरूवात केली. घटनेनंतर काही वेळातच संशयीत आरोपी किशोर बामणे आणि सोनू सकें हे जत बाहेरील एका घरात पोलीसांना मिळून आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन जत पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी करायला सुरूवात केल्यावर ते दोघे ना चा पाढा वाचत होते. पोलीसांनी त्यांना पोलीसी खाक्या दाखवून सीसीटीव्हीचे फुटेज दाखविले असता त्या दोघांनी आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलिसांना दिली. या घटनेतील इतर दोघे विजय कांबळे आणि आनंदा कांबळे हे फरार असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते. या घटनेची जत पोलीसात फिर्याद मयत अविनाश कांबळे याच्या नातेवाईकांनी दिल्यावर पोलीसांनी त्याच्या फिर्यादीवरून अविनाश बाळू कांबळे (वय ३०) याच्या खून प्रकरणी जत पोलीसात किशोर नारायण बामणे (वय २८) सोनु संके, विजय महेंद्र कांबळे, आनंदा ईश्वर कांबळे याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,३४ सह गुन्हा नोंदविला. किशोर बामणे आणि सोनू सकें यांना पोलीसांनी जत येथील न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलिसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली तलवार आणि बाईक जप्त केली.

या घटनेतील उर्वरीत विजय कांबळे आणि आनंदा कांबळे याचा पोलीस शोध घेत होते. या घटनेचा पुढील तपास जत पोलीस करीत आहेत. दारू सारख्या व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तीचा संयम हा सुटत असतो. तो दारूच्या नशेत कधी काय करून बसेल हे सांगता येत नाही अविनाश याने दारूच्या नशेत आपल्या वहिनीबरोबर वाटणीवरून भांडण काढले. परंतु त्या भांडणात त्याने वहिनीच्या भावाच्या गाडीची काच फोडली आणि कुठले प्रकरण कुठे गेले आणि त्या प्रकरणात अविनाशचा खून झाला एवढे मात्र खरे....!

## संशय आल्याने प्रियकराने तिचा...

मित्रही असू शकतात. ही मैत्री काही वेळा प्रियकराच्या मनात संशय निर्माण करते. त्याने आपल्या प्रेमावर विश्वास ठेवला नाही, तिच्या मैत्रीवर संशय घेतला तर मात्र प्रेम संपून द्वेष वाढण्यास वेळ लागत नाही. नाशिक शहरात घडलेल्या एका घटनेने हेच दाखवून दिले. ती १९ वर्षाची, तो २९ वर्षाचा होता. दोघे नंदूरबार जिल्ह्यातील असून ती शिक्षणासाठी नाशिकला आली, म्हणून तोही आला. काम करू लागला, भाड्याने खोली घेऊन राहू लागला. तीही कधी-कधी त्याच्या खोलीवर जात-येत होती. सारे सुरळीत सुरू असतांनाच ती अन्य कोणाशी चॅटींग करते या कारणातून वाद सुरू आला. या वादाचा शेवट तिच्या खुनात आणि तो तुरूंगातजाण्यात झाला. सागर चिवदास तडवी (वय २१) हा मूळचा नंदुरबार जिल्ह्यातील होता, तर प्रियंका बीरजी वसावे (वय १९) हीसुध्दा नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा गावातील रहाणारी होती.

ती नाशिकमधील संभाजीनगर नाक्यावरील एका नर्सिंग कॉलेजमध्ये ती परिचारिकेचे शिक्षण घेत होती. प्रियांका शिक्षणासाठी नाशिकला आली, तसा सागरही नाशिकला पोहचला. ती शिवशक्तीइंदिराबिल्डींग, दुसरा मजला, गांधी हॉस्पिटलजवळ, पंचवटी येथे रहात होती, तर तो माऊलीनगर, अंबड-नाशिक येथे भाड्याने खोली घेऊन राहू लागला. एका कंपनीत मजूरी करून तो उदरनिर्वाह करू लागला. यामागचे कारण होते प्रेम. सागर आणि प्रियांका यांचे अनेक वर्षापासून प्रेमसंबंध होते, त्यामुळेच ती नाशिक येथे आल्याचे पाहून तोही नाशिकला आला. त्याने भाड्याने खोली घेतली आणि ही खोली त्या दोघांचे मिलनस्थळ बनली. तिथे त्यांना रोखणारे कोणी नव्हते, त्यामुळे प्रियंकाचे त्याच्या खोलीवर नेहमी येणे-जाणे असायचे. प्रियंकाचा चुलत भाऊ अनिल सोमय्या वसावे (वय ३०) हा फार्मासिस्ट असून तो कृष्ण कॉलनी, सिन्नर फाटा, चेहडी, नाशिक रोड येथे गेल्या सहा वर्षापासून रहातो, तर त्याची लहान बहीण वैशाली हीसुध्दा प्रियांकासोबत नर्सिंगचे शिक्षण घेत होती. वैशाली ही राधारामन सोसायटी, एकलेनगर, जुना आडगाव नाका, पंचवटी येथे रहात होती. दि. २१ डिसेंबर २०२३ रोजी प्रियंका व वैशाली यांच्या नर्सिंगच्या पहिल्या वर्षाच्या परिक्षा संपल्या. त्यानंतर वैशाली ही भाऊ अनिलकडे निघून गेली, तर प्रियंका ही गावी पाटबारा येथेनिघून गेली होती. त्यानंतर दि. १३ जानेवारी २०२४ रोजी प्रियंका पुन्हा नाशिकला आली. ती आपल्याखोलीवर रहात होती. ती दि. १९ जानेवारी रोजी आपले कपडे बॅगेत भरून खोलीतून बाहेर पडली. ती सागरच्या खोलीवर रहाण्यास गेली होती हे तिच्या मैत्रिणीलामाहित होते, कारण सागर आणि प्रियंकाचे तीन वर्षापासून प्रेमप्रकरण सुरू होते. आता ते बहुतेकांन माहित झाले होते. ती सागरसोबत खोलीवर रहात होती. दोन-तीन दिवस कसे तरी गेले असतील, त्या दरम्यान त्यांच्यात काही ना काही कारणावरून वाद झाले होते. दि. २२ जानेवारी २०२४ रोजी रात्री एक ते दीड वाजण्याच्या सुमारास प्रियंका दुसऱ्या कोणाशी तरी मोबाईलवर चॅटींग करत होती. हे पाहून सागरचे पित्त खवळले. मध्यरात्री कोणाशी चॅटींग करतेस असे विचारत त्याने तिच्याशी वाद घालण्यास सुरूवात केली. यातूनच त्या दोघात जोरदार भांडण सुरू झाले. ती उलट उत्तर देत असल्याने संतप्त झालेल्या सागरने तिच्यावर हात उचलला. मारहाण करत प्रियंकाचा ओढणीच्या सहाय्याने गळा आवळून खून केला. ती गतप्राण झाल्यानंतर आपल्या हातून खून झाल्याचे त्याच्या लक्षात आले. या खुनातून सुटका करून घेण्यासाठी त्याने मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचे ठरवले. त्याने एका मित्राच्या मदतीने प्रियंकाचा मृतदेह चार चाकी गाडीत टाकूनउड्डाणपुलामार्गे राम मंदिर येथून रासबिहारी लिंक रोडवरील मिराद्वार लॉन्सशेजारील मोकळ्या जागेत टाकून देवून पळ काढला. नाशिक शहरातील रासबिहारी लिंक रोडवरील मोकळ्या जागेत एका तरूणीचा मृतदेह पडला असल्याची खबर मिळताच पंचवटी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह विच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवला. ती तरूणी १९ ते २० वर्षाची होती. तिच्या गळ्यावर व्रण होते. याचा अर्थ तिचा गळा दाबून खून करण्यात आला होता आणि तिचा मृतदेह मारेकल्याने याठिकाणी आणून टाकला होता. मयत तरुणीची ओळख पटली नव्हती. पोलिसांनी घटनास्थळी काही मिळते का? याचा शोध घेतला मृतदेहाजवळ तिचे आधार कार्ड आणि इतर काही साहित्य मिळून आल्याने तिचे नाव प्रियंका वीरजी वसावे (वय १९) असे समजून आले. ती नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा गावातील रहाणारी होती. नाशिकमधील संभाजीनगर नाक्यावरील एका नर्सिंग कॉलेजमध्ये ती परिचारिकेचे शिक्षण घेत होती. तरूणीची ओळख पटल्याने पोलिसांना हायसे वाटले, कारण आता पुढील तपास सुकर होणार होता. पोलिसांनी मिळालेल्या माहितीवरून तिच्या नातेवाईकांशी संपर्क साधला आणि तपासाला सुरुवात केली. प्रियंकाचा शेवटच्या क्षणी कोणाशी संपर्क आला? मोबाईल फोनवर ती कोणाशी बोलली ? याची माहिती पोलिसांनी मिळवली असता सागर चिवदास तडवी (वय २१) मूळ रहाणार नंदुरबार, सध्या माऊलीनगर, अंबड-नाशिक याचे नाव समोर आले. दरम्यान दि. २३ जानेवारी २०२४ रोजी दुपारी १२ वाजता प्रियंकाचे वडील साईसिंग वसावे यांनी पुतण्या अनिल यासफोनवर सांगितले, की प्रियंकाचे काहीतरी झाले आहे. तू कॉलेजला जावून ये. त्याप्रमाणे अनिल याने बहीण वैशाली हिलासोबत घेवून साई नर्सिंग कॉलेजला गेले असता तेथे पोलीस आले होते. पोलिसांनी त्यांना सांगितले की प्रियंका ही मिराद्वार लॉन्समागे, म्हस्केनगर, पंचवटी, नाशिक येथे मृतावस्थेत मिळून आलेली आहे. पोस्टमार्टमसाठी तिचा मृतदेह सिव्हील हॉस्पिटल येथे नेला आहे, त्याप्रमाणे ते लगेच सिव्हील हॉस्पिटलला गेले आणि प्रियंका हिच्या मृतदेहाची पहाणी केली असता तिच्या गळ्यावर वळ दिसत होते. गळा दाबून तिचा खून करण्यात आला होता. आपल्या चुलत बहीणीचा खून झाला आहे, तो कोणी केला असावा याबाबत पोलिसांनी विचारणा केली असता अनिल यांनी माहिती दिली की, प्रियंका हिये आमच्याच गावातील सागर तडवी या तरूणाबरोबर मागील ३ वर्षापासून प्रेमसंबंध आहेत.

या प्रेमसंबंधादरम्यान त्यांच्यामध्ये अनेक वेळा भांडणेही झालेली आहेत. ते दोघे नाशिकला रहात असल्याने एकमेकांना भेटत होते, तरप्रियंका वसावे हिच्या एका मैत्रिणीने मला सांगितले होते की दि. १९ जानेवारी २०२४ रोजी प्रियंका बॅगेत कपडे भरून सागर तडवी याच्याकडे गेली होती, त्यामुळे सागर यानेच काहीतरी कारणावरून गळा आवळून तिला ठार मारले असावे असा संशय व्यक्त केला. तिचे फोन कॉल, लोकेशन्स, चुलत भावाने व्यक्त केलेला संशय यातून चित्र स्पष्ट झाले होते. पंचवटी पोलीस ठाण्यात अनिल सोमय्यावसावे याने दिलेल्या फिर्यादीवरून सागर तडवी याच्या विरोधात गुन्हा रजि. नं. ३७/२०२४ भा.दं.वि. ३०२ खाली गुन्हा दाखल करण्यात आला. तपासाची चक्रे बेगाने फिरवत पोलिसांनी सागर तडवी, व त्याच्या मित्राचा शोध घेवून गजाआड केले.पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाणयांच्या मार्गदर्शनाखाली पंचवटीचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सोहन माच्छरे, विलास घिसडी, पोलीस हेड कॉन्स्टेबल कैलास शिंदे. पोलीस नाईक संदीप मालसाने यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे व तांत्रिक विश्लेषण करत आरोपींना गजाआड केले.

## बायल्या मित्राला शरीर सुखासाठी...

बऱ्याच वेळेला समजावून सांगितले की, मी त्यातील नाही, माझा स्वभाव आणि गुण तसा आहे त्याला मी तरी काय करू. परंतु भगवान हा काही त्याची पाठ सोडत नव्हता. सुशांत भेटला की, त्याला तो अश्लिल हावभाव करीत होता. त्याला सेक्स करण्यासाठी चिथावणी देत होता. खरे तर सुशांत हा बाईकी असल्याने त्याचे राहणीमान हे तृत्तीयपंथीय सारखे आहे याची कल्पना गावातील बऱ्याच लोकांना माहिती होती तशी ती गोष्ट भगवान याला ही माहिती होती. म्हणून तो त्याला त्या कामासाठी माझ्याबरोबर चल असे म्हणत होता.तरूण वयात लवकर लग्न झाले नाही तर अनेकजण समलैंगिक संबंधाकडे वळतात. तसे भगवानला देखील समलैंगिक संबंध सुशांतबरोबर करावे असे वाटत होते. त्यात त्याची काही चुक नव्हती.कारण वयाची २५वीशी आली तरी काही केल्या त्याचे लग्न जमत नव्हते. त्याचा दिवस कसा तरी जात होता. परंतु रात्र त्याला खायला उठत होती. त्याला सेक्स करण्याची इच्छा होती. परंतु तसे त्याला कुणी मिळत नव्हते. म्हणून तो गे असणाऱ्या मित्र सुशांतकडे त्या नजरेने पाहत होता. सुशांत त्याला भेटायला आला की, त्याची सेक्सची भावना त्याला स्वस्थ बसु देत नव्हती. तसा सुशांत ही देखणा होता.एकदा बाईला ही लाजवेल असा तो चिकणा दिसत होता. भगवान त्याला सेक्स करायला चल म्हरून त्याच्या मागे लागायचा.सुशांतला याचा राग येऊ लागला. एकदा तर भगवान याने चार मित्रात सुशांतला ऐ बायक्या म्हणून हाक मारली. चल की रे... असे अर्वाच्च भाषेत शिव्या देत त्याचा अपमान केला. भगवाने सुशांतला चार चौघात ऐ बायक्या म्हटलले त्याला आवडले नव्हते. भगवानला कायमचा धडा शिकवला पाहिजे नाही तर तो सारखा आपला अपमान करेल याची भिती सुशांतला होती. भगवानचे टोमणे मारणे सेक्ससाठी चल म्हणणे सुशांतला जिव्हारी लागत होते. गुरूवार दि.१५ फेब्रुवारी रोजी रात्री सुशांतने त्याला फोन करून सांगितले की मी उदया तुझी इच्छा पुर्ण करतो. मी उदया कुठे येऊ सांग असे म्हटल्याने भगवानला आपली इच्छा पुर्ण होणार असे वाटले. त्याने त्याला उदया आपल्या सुतारकीच्या शेतात सकाळी ये. तेथे आपण दोघे कार्यक्रम करू असे सांगितले. सुशांतच्या मनात वेगळेच असल्याने तो तयार झाला. इकडे दुसऱ्या दिवशी सकाळी भगवान याने आपल्या आईला सुतारकीच्या शेतात ज्वारीची कणसे खुडयाची असल्याचे सांगून तो घराबाहेर पडला. सकाळी तो लवकर शेतात गेला. परंतु सुशांत काही लवकर आला नाही. सकाळी ११च्या दरम्यान सुशांत भगवानच्या शेतात आला. तो आल्यावर घाई घाईने त्याला ज्वारीच्या फडात नेले. तो त्याला पुढे वाकवित होता. परंतु सुशांत त्याला थांब असे म्हणत होता. या कारणातून त्या दोघांचा तेथे वाद चालू झाला. भगवान त्याला सेक्स करूया म्हणत होता. परंतु त्या गोष्टीला सुशांत काही तयार होत नव्हता. दोघांत वाद सुरू असताना रागा रागाने सुशांतने जवळच पडलेला लोखंडी रॉड घेतला आणि सुशांतच्या डोक्यात जोरात हाणला. त्याला अर्वाच्च भाषेत शिव्या देत मर साल्या म्हणत परत एकदा त्याच्या डोक्यात तोच रॉड जोरात हाणला. त्या सरशी भगवानचे डोके फुटून त्यातून रक्तस्त्राव सुरू झाला. तो ओरडतच आपल्या शेतात पडला.काही वेळाने त्याचा श्वासो श्वास बंद पडल्यावर सुशांतने तेथून काढता पाय घेतला. इकडे सकाळी शेतात गेलेला मुलगा जेवायला ही घराकडे परत आला नाही म्हणून त्याची आई त्याचा शोध घेत शेतात गेली. तिला तो कुठे दिसत नव्हता म्हणून ती त्याला हाका मारीत ज्वारीत शिरली. आतील बाजूस एका सरीत भगवान हा रक्ताच्या थारोळ्यात पालथा पडला असल्याचे दिसले. त्याचे डोके फुटले होते. तर त्याच्या बाजुलाच रक्ताने माखलेला लोंखडी रॉड ही होता. हे बघून त्याच्या आईने मोठयाने हंबरडा फोडून रडायला सुरूवात केली. तिच्या ओरडण्याने बाजुच्या शेतातील लोक तेथे आले. कुणी तरी या घटनेची माहिती गावात आणि वाठार पोलीसांना दिली. या घटनेची माहिती समजताच वाठार पोलीस स्टेशनचे पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाची पाहणी करून तपासाला सुरूवात केली.घटनास्थळी वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यांनी भेट देऊन या घटनेची माहिती घेऊन पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. पोलिसांनी घटनास्थळी श्वान पथकाला आणि ठसे तज्ञांना ही पाचारण केले. श्वान घटनास्थळापासून काही अंतरावर जाऊन तेथे घुटमळले. वाठार पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून उतरीय तपासणीसाठी मृतदेह वाठार येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेचा तपास वाठार पोलीसाबरोबर सातारा स्थानिक गुन्हे अन्वेषणचे एक पथक ही करीत होते. या घटनेला १२ ते १५ दिवस झाले तरी भगवान याचा खून कोणी केला आणि तो कोणत्या कारणासाठी केला याचा काही उलघडा पोलीसांना करता आला नाही. तरी ही स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस संशयीत आरोपीच्या मागावर होते. या पथकातील पाच ते सहा पोलीस वेशांतर करून पिंपोडे ब्रु. येथे फिरत होते.गावात भगवान सकपाळ याच्या खूनाविषयी काय माहिती मिळते का याचा ते मागोवा घेत होते. कारण भगवान याचा खून करण्यासाठी त्याची कोणाबरोबर कसली ही दुश्मनी नव्हती. किंवा त्याचे कोणाबरोबर कसले भांडण ही नव्हते. त्याचा खून करणाऱ्या संशयीताने मागे कोणाताच पुरावा सोडला नव्हता. पिंपोडे ब्रु येथे वेशांतर करून फिरणाऱ्या एका पोलीस कर्मचाऱ्याला गावातीलच सुशांत सांळुखे आणि मयत भगवान सकपाळ याची मैत्री असल्याची माहिती मिळाली. तसेच घटनेच्या दिवशी सकाळी सकाळी मयत भगवान याला शेतात जाताना अनेकांनी बघितले होते. तर त्यानंतर त्याच्या शेतात सकाळी ११च्या दरम्यान सुशांतला ही भगवान याच्या शेतात जाताना एका इसमाने पाहिले होते. या माहितीवरून घटनेच्या १२व्या दिवशी संशयावरून पोलिसांनी पिंपोडे ब्रु गावातून सुशांत साळुंखे याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. या घटनेला बरेच दिवस झाले असल्याने आपण केलेला गुन्हा पचला असे सुशांतला वाटत असतानाच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याला वाठार पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे भगवान याच्या खूनाविंयी विचारले असता तो पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे देत होता. त्याच्या बोलण्यात पोलिसांना विसंगती जाणवत होती. तसेच तो बाईकी आणि गे असल्याचे पोलिसांच्या लक्षात येताच येथेच कुठे तरी पाणी मुरत आहे हे ओळखून पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविला असता त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. मयत भगवान सकपाळ हा त्याला समलैंगिक संबंध ठेवण्यासाठी मजबुर करीत असल्याने आपण त्याचा चिडून खून केला असे त्याने पोलिसांना सांगितले. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर पोलीसांनी या घटनेची लेखी फिर्याद मयत भगवान सकपाळ याच्या आईकडून घेतली. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार पोलिसांनी भगवान मच्छिंद्र सकपाळ (वय २४) याच्या खुन प्रकरणी सुशांत संजय साळुंखे (वय २२) याच्या विरोधात वाठार पोलीस ठाण्यात भा.दं.वी. कलम ३०२, सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला कोरेगाव येथील कोर्टात हजर केले. मा.कोर्टाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलिसांनी त्याच्यांकडून गुन्हयात वापरलेला लोखंडी रॉड जप्त केले.

या घटनेचा तपास पोलीस अश्रिक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधिक्षक ऑचल दलाल, पोलीस उपाधिक्षक सोनाली कदम याच्या मार्गदर्शनाखाली पो.निरी अरूण देवकर, स.पो.नि. सुधीर पाटील, रोहित फार्णे, अशोक हुलगे, फौजदार विश्वास शिंगाडे, अमित पाटील, नितीन भोसले, शरद बेबले, साबीर मुल्ला, लक्ष्मण जगधने, प्रविण फडतरे, मुनीर मुल्ला, अमोल माने, अजित कर्णे, सनी आवटे, सचिन ससाणे, स्वप्नील दौंड यांनी केला. समाजात बरेच लोक बाईकी आणि तृत्तीयपंथीय म्हणून वावरत असतात. त्याच्याबरोबर सेक्स करण्याची अनेकांची इच्छा ही असते. परंतु सेक्स करण्यासाठी ते तयार झाले नाहीत तर ते कोणत्या ही थराला जावू शकतात हेच या घटनेवरून दिसून येते.

11 TO 17 MARCH 2024 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 3/9/2024 9:25 PM Page 1



# चोरून हातभट्टी दारू तयार करणाऱ्यांवर तालुका पोलिसांची धाड

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरून अवैध हातभट्टी दारू तयार करणारे विरूध्द कारवाई करण्यात आली आहे. १ लाख ९२ हजार १५० रूपये किंमतीची ३७०० लिटर हातभट्टी दारू व ४० हजार रूपये किंमतीची दुचाकी मोटार सायकल असे एकूण २ लाख ३२ हजार १५० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आली आहे. आगामी लोकसभा निवडणुक २०२४ची प्रक्रिया शांततेत पार पाडुन कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी या अनुषंगाने सोलापूर तालुका पोलीस ठाणे कडील कार्यरत असलेले पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे ३, ४, ६ मार्च रोजी असे ३ दिवस चोरून अवैधरित्या हातभट्टी दारू बाळगणाऱ्या इसमा विरूध्द कारवाई करण्याच्या अनुषंगाने पेट्रोलिंग करीत असताना त्यांना त्यांचे गोपनिय बातमीदार यांचे कडून मौजे मुळेगांव तांडा ता.द.सोलापूर येथील सालकी वेअर हाऊसच्या पुर्व बाजुस चिल्लारीच्या तसेच मुळेगाव तांडयाच्या दक्षिण बाजुस असलेल्या चिल्लारीच्या झाडाझुडपाच्या आडोशाला व मौजे वरळे गाव तांडयाच्या पुर्व बाजुस असलेल्या शेत बांधाजवळ चोरून अवैधरित्या हातभट्टी दारूच्या रबरी टयुबा, प्लॅस्टीक घागरी, बॅरेल तसेच हातभट्टी दारू तयार करण्याचे साहित्य काही इसम बाळगुन आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाली होती त्या नुसार मिळालेल्या बातमी प्रमाणे सदर ३ ठिकाणी छापे टाकुन कारवाई केली आहे. तसेच ६ मार्च रोजी मुळेगाव ता.द. सोलापूर येथील हनुमान मंदीराच्या समोरील रोडवर दोड्डी गावाकडुन येणाऱ्या रोड वरून एक इसम त्याचे ताब्यातील सुझुकी कंपनीची दुचाकी मोटार सायकली वरून ६ काळ्या रंगाच्या रबरी टयुबा त्यामध्ये १२ हजार रूपये किंमतीची २४० लिटर हातभट्टी दारू बेकायदेशीररित्या वाहतुक करीत असताना मिळुन आला आहे त्याचेकडुन २४० लिटर हातभट्टी दारू व दुचाकी वाहनासह एकूण ५२ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. वरील



ठिकाणी केलेल्या हातभट्टी दारूच्या रबरी टयुबा व हातभट्टी दारू तयार करण्याच्या साहित्य जवळ बाळगुन असलेल्या छापा कारवाईत एकूण १० रबरी टयुब, ५५ प्लॅस्टीकच्या घागरी, ११ प्लॅस्टीक बॅरेल असा १ लाख ९२ हजार १५० रूपये किंमतीची ३ हजार ७०० लिटर हातभट्टी दारू तसेच ४० हजार रूपये किंमतीची दुचाकी मोटार सायकल असा एकूण २ लाख ३२ हजार १५० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून केलेल्या कारवाईत एकूण ४ इसमा विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायद्या अन्वये ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. चोरून अवैधरित्या हातभट्टी दारू बाळगणाऱ्या इसमांची माहिती काढुन त्यांचे विरूध्द कारवाई करण्याचे यापुढेही कामकाज चालु असणार असल्याचे संकेत देवळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर यांनी सांगितले आहे. सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांचे मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांचे नेतृत्वाखाली सोलापूर तालुका पोलीस ठाणे कडील कार्यरत असलेले पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी बजावली आहे.

# डॉ.श्यामलीला बावगे सावित्रीच्या लेकीचा पुरुसकाराने सन्मानित



**औसा/प्रतिनिधी**

येथील श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था अंतर्गत, लातूर कॉलेज फार्मसी हासेगाव महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ श्यामलीला बावगे (जेवळे) यांचा आर एन मोठेगावकर विद्यालय लातूर यांच्यातर्फे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांनी सामाजिक आणि शिक्षण क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्य पाहून सन्मान सावित्रीच्या लेकीचा या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी आरसीसी चे संचालक शिवराज मोठेगावकर, जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी अमोल सगर, दिशा प्रतिष्ठानचे संचालक अभिजीत देशमुख, राजश्री शाहू महाराज शिक्षण संस्थेचे सचिव मीना मोटेगावकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर अप्पा बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, कोषाध्यक्ष शिवलिंग जेवळे संचालक नंदकिशोर बावगे, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, राजीव गांधी पॉलिटेक्निक कॉलेज, लातूर कॉलेज ऑफ औधोगिक प्रशिक्षण संस्था, गुरुनाथ अप्पा बावगे इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल, लातूर कॉलेज ऑफ सायन्स, लातूर, लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर, या सर्व युनिट चे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विध्यार्थी यांनी प्राचार्या डॉ.श्यामलीला बावगे (जेवळे) यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# भिवंडीत हुक्का पार्लरवर पोलिसांनी केलेल्या कारवाईत हुक्का पिणाऱ्या ३१ दुचाकी केल्या जप्त

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडी शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत पणे हुक्का पार्लर सुरू असून पोलीस प्रशासनातील बदल्या नंतर नव्या पोलिस अधिकाऱ्यांकडून अशा हुक्का पार्लरवर कारवाई सुरू असून अशाच एका कारवाईत भिवंडी तालुका पोलिसांनी केलेल्या कारवाईत हुक्का पिण्यासाठी आलेल्या तब्बल ३१ जणांची दुचाकी वाहन जप्त केली आहेत. भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील पोगाव या गावात बीबीए चायनीज कॉर्नर या ठिकाणी अनधिकृतपणे हुक्का पार्लर सुरू होता.या बाबतची माहिती नवनियुक्त पोलीस उपअधीक्षक राहुल झाल्टे यांना मिळाल्यानंतर त्यांच्या निर्देशानुसार भिवंडी तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादासो एडके यांनी पोलीस पथकासह सोमवारी रात्री या हुक्का पार्लरवर कारवाई केली.हुक्का पार्लर चालक अली शफिक पटेल रा. अर्जुनली पडघा त्याचे दोन नोकर व ३१ ग्राहकांवर गुन्हा दाखल करीत या ग्राहकांच्या ३१ दुचाकी जप्त करून पोलिस ठाण्यात आणल्या आहेत. पोलिसांनी कारवाई करताना दुचाकी जप्त करण्यात हा पहिलाच प्रकार असल्याने हुक्का पार्लर चालक तसेच हुक्का पिण्यासाठी जाणारे यांच्यामध्ये खळबळ माजली आहे.

# मराठी भाषा दिनानिमित्त वाचनालयात पुस्तकांचे प्रदर्शन




वाडा : कुसुमाग्रज हे एक श्रेष्ठ मराठी कवी, कादंबरीकार व नाटककार होते त्यांचे पूर्ण नाव विष्णू वामन शिरवाडकर.२७ फेब्रुवारी हा त्यांचा जन्म दिवस असल्याने हा दिवस मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. वाचन संस्कृती टिकून रहावी या उद्देशाने वाड्यातील महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालय येथे वाचकांसाठी विविध पुस्तके उपलब्ध करून दिली होती. या प्रसंगी अध्यक्ष निलेश गंधे, उर्मिला पाटील व इतर पदाधिकाऱ्यांनी आपली मते व्यक्त केली तर कार्यक्रमास जेष्ठ वाचक व विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.

# नालासोपाऱ्यातील बनावट चकमक प्रकरणी दोन पोलिसांना हत्येच्या गुन्ह्यात अटक!

**नालासोपारा/प्रतिनिधी**




नालासोपारा मधील २०१८ साली झालेल्या जोगिंदर राणा याच्या चकमक प्रकरणात ठाण्याच्या विशेष तपास पथकाने नालासोपारा मधील दोन पोलिसांना शनिवारी अटक केली. मंगेश चव्हाण आणि मनोज सकपाळ अशी या पोलिसांची नावे आहेत. त्यांना ११ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. २०१८ मध्ये नालासोपारा येथे सराईत गुंड जोगिंदर राणा याचा पोलीस चकमकीत मृत्यू झाला होता. मात्र ही चकमक बनावट असून माझ्या भावाची हत्या केल्याचा आरोप मयत जोगिंदर राणा याचा भाऊ सुरेंद्र राणा याने केला होता. स्थानिक पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केले होते. त्यामुळे या प्रकरणात सुरेंद्र राणा याने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी ठाणे पोलीस उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली होती. २०२३ मध्ये या प्रकरणात मंगेश चव्हाण आणि मनोज सकपाळ या दोघांवर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र त्या दोघांना अटक करण्यात आली नव्हती. दरम्यान, शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणी पोलिसांवर जोरदार ताशेरे ओढले आणि या प्रकरणाचा तपास समाधानकारक होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे शनिवारी तातडीने कारवाई करत चव्हाण आणि सकपाळ या दोघांना अटक केली. त्या दोघांना वसई न्यायालयात हजर केले असता दोघांना ११ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, अशी माहिती विशेष तपास पथकाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सुरेश वराडे यांनी दिली. सध्या मंगेश चव्हाण सध्या नालासोपारा पोलीस ठाण्यात तर मनोज सकपाळ गुन्हे शाखा ३ च्या पथकात कार्यरत होते. दरम्यान नालासोपारा येथे राहणारा जोंगिदर राणा हा सराईत गुंड होता. त्याच्यावर वांद्रे, खार, सांताक्रूझ, जुहू, कांदिवली आणि अर्नाळा पोलीस ठाण्यात ३७ गुन्हे दाखल होते. त्यात चोरी आणि दरोड्याच्या गुन्ह्यांचा समावेश होता. त्यातील बहुतांस गुन्ह्यात तो शिक्षा भोगून आला होता. विरार मधील अर्नाळा पोलीस ठाण्यात त्याच्यावर एक गुन्हा दाखल होता. माझ्या भावाने गुन्हेगारी विश्व सोडले होते आणि तो चालक म्हणून काम करत होता असे ते म्हणाले असे सुरेंद्र राणा यांनी सांगितले.

# पैशांचा पाऊस पाडण्याचे प्रलोभन दाखवून मुलींचे शोषण, मांत्रिकासह टोळीला अटक

**ठाणे/प्रतिनिधी**

पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष दाखवून मुलींचे लैंगिक शोषण करणाऱ्या मांत्रिक बाबासह सात जणांच्या टोळीला ठाणे गुन्हे शाखेच्या युनिट एकने बेड्या ठोकल्या आहेत. या टोळीत महिलेचाही समावेश असून महाराष्ट्राच्या विविध भागातील गोरगरीब मुलींना या टोळीने स्वतःच्या जाळ्यात ओढून त्यांचे लैंगिक शोषण केल्याचे पोलिसांच्या चौकशीत समोर आले आहे.

ठाण्याच्या राबोडी येथील एका अल्पवयीन मुलीचे या टोळक्याने शोषण केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला असून भविष्यात या प्रकरणातील चौकशीतून धक्कादायक खुलासे समोर येण्याची शक्यता आहे. ठाण्याच्या राबोडी पोलिस ठाण्यात १५ वर्षीय मुलीच्या अपहरणाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेच्या युनिट एककडून सुरू होता. युनिटचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिलीप पाटील, पोलिस निरीक्षक कृष्णा कोकणी, सहायक पोलिस निरीक्षक विकास सूर्यवंशी यांच्यासह त्यांच्या पथकाने कसून तपास करत १७ फेब्रुवारीला राबोडीतील असलम खान (५४), सलीम शेख (४५) या दोघांना या प्रकरणात अटक केली. तर २७ फेब्रुवारीला मुंबईच्या अँटॉप हिल झोपडपट्टीतील मांत्रिक साहेबलाल वजीर शेख उर्फ युसुफ बाबा (६१) याला अटक केली. या त्रिकुटाच्या चौकशीतून राबोडीतील तौसिफ शेख (३०), शबाना शेख (४५), शब्बीर शेख (५३) तसेच लालबाग, मुंबईतील हितेंद्र शेट्टे या चौघांना अटक करण्यात आली. ही टोळी गोरगरीब पीडित मुलींना हेरून पैशांचा पाऊस पाडण्याचे प्रलोभन दाखवत असे. तसेच विश्वास बसावा यासाठी मोबाइलमध्ये रेकॉर्डिंग केलेला महिलेचा आक्षेपार्ह स्थितीतील व्हिडिओ मुलींना दाखवला जात होता. यामध्ये महिलेशेजारी पैशांचा ढीग पडलेला दिसत असे. तुम्हाला अशा पद्धतीने कोट्यावधी रुपये हवे असतील तर, विधी करण्यास सांगून मांत्रिक व त्याचे साथीदार पीडित मुलीवर अत्याचार करीत होते. राबोडी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने घरातून गायब झालेल्या एका तरुणीचा पोलिसांनी शोध घेतल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघड झाला. पीडित मुलींना या विधीच्या नावाखाली बंद खोलीत आणल्यानंतर टोळीतील सदस्य आपापसात कोडवर्डमध्ये संवाद साधत होते. मांत्रिकाला डॉक्टर, मुलींना रस्सी असे संबोधले जात होते.

या टोळीने आतापर्यंत महाराष्ट्राच्या विविध भागातील तब्बल १७ मुलींशी असे गैरवर्तन केल्याची प्राथमिक माहिती पोलिस चौकशीत समोर आली आहे. अशा टोळीच्या बळी पडलेल्या मुलींनी घाबरून न जाता पोलिसांकडे धाव घेत या प्रकरणाची माहिती देण्याची आवश्यकता असल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच पालकांना आपल्या मुलींच्या वर्तवणुकीत कोणताही बदल झालेला आढळल्यास त्यांना विश्वासात घेत चर्चा करण्याचा सल्लाही पोलिसांनी दिला.


सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय**

**ठाणे विद्युत विभाग, सा.बां. विभाग, सा.बां. परिसर,**

**मराठी ग्रंथ संग्रहालयाजवळ, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम) पिन कोड : ४००६०१.**

| | |
|---|---|
| दुरध्वनी क्र. (०२२) २५३३ ३१४४<br>(०२२) २५३० ४५१४ | वेबसाईट : www.mahapwd.com ई–मेल : elthane.ee@mahapwd.gov.in |
| | जा.क्र. : काअ/ठाविवि/निविदा–१/१३०६/ सन २०२४ दिनांक : ०५/०३/२०२४ |

**फेर निविदा कामासह ई–निविदा सूचना क्र. ४७ सन २०२३–२०२४**

**संदर्भ : १. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधाम विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/ इमारती–२ दिनांक : २७ सप्टेंबर २०१८**

**२. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधाम विभाग, मंत्रालय, मुंबई, क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र. १०४/इमा–२ दिनांक ७ ऑगस्ट २०२३**

**कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां. विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२)२५३३३१४४ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी.**

**तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.**

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम रुपये | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापुर्व बैठक/ ठेकेदारांचा वर्ग/ इसारा रक्कम/ कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | Est.No. 141041/2023-24 Providing Passenger Lift (2 Nos) in Proposed Annex Court Building (Stilt + 3 Floors) at Palghar Tal & Dist. Palghar - (Recall Tender - 3rd Call) | रु. ३०,९६,७७४/- | दिनांक ०७/०३/२०२४ सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक १४/०३/२०२४ सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत | निविदापुर्व बैठक नाही<br>उद्वाहनाचे मुळ उत्पादक यासह उदवाहन अनुज्ञाप्ती परवानाधारक ठेकेदार (एकल गती/बदलते गतीमान स्वयंचलित प्रकार एकत्रित वार्षिक 500 किंवा त्यावरील उदवाहन उभारणी व देखभाल दुरुस्ती प्रमाणपत्र परवानाधारक) ज्यांना महाराष्ट्र शासन व निम्नशासकीय ठिकाणी उदवाहन बसविणे व वार्षिक देखभाल/ दुरुस्ती- अशा प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे.<br>इसारा रक्कम रु. ३१,०००/-<br>निविदा शुल्क रु. ५००/- अधिक वस्तू व सेवा कर (ना परतवा) | दिनांक १६/०३/२०२४ सकाळी ११.०० (शक्य झाल्यास) |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. सर्व पात्र निविदाकारांनी निविदा पत्रक डाऊनलोड व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी https://mahatenders.gov.in ई-निविदा प्रणाली बघावी सदरील कामात काही बदल अथवा वेळेत काही बदल झाल्यास https://mahatenders.gov.in वर सदर बदल नमुद करण्यात येईल, याबाबत वर्तमान पत्रामध्ये फेर निविदा जाहीरात करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

२. कार्यकारी अभियंता (विद्युत), ठाणे विद्युत विभाग, सा.बां. विभाग, सा.बां. परिसर, ठाणे (पश्चिम), दुरध्वनी क्र. (०२२) २५३३३१४४ कार्यालयातील सुचना फलक, कार्यकारी अभियंता यांना विनंती केल्यास निविदा जाहीरात छायाप्रत देण्यात येईल.

३. **वरील कामाकरीता** उदवाहनाचे मुळ उत्पादक ठेकेदार यासह महाराष्ट्र शासनाच्या ऊद्योग, उर्जा कामगार विभागकडील विद्युत अनुज्ञाप्ती परवानाधारक ठेकेदार (एकल गती/ बदलते गतीमान स्वयंचलित प्रकार एकत्रित वार्षिक ५०० किंवा त्यावरील उदवाहन उभारणी व देखभाल दुरुस्ती प्रमाणपत्र परवानाधारक) तसेच या प्रकारचे काम केल्याचा अनुभव आहे असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात.

४. संबधीत कामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र १ मध्ये इतर आवश्यक कागदपत्रांसह जोडण्यात यावे तसेच तांत्रिक पडताळणी कागदपत्रे यादी अनुक्रमाप्रमाणेच सादर करणे आवश्यक व अनिवार्य आहे.

५. निविदाकारांनी निविदा संदर्भातील सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे आवश्यक व अनिवार्य आहे. तसेच निविदा इसारा/बयाणा रक्कम ई निविदा खरेदी किंमत चाबाबतच्या दस्तऐवजाच्या मुळ प्रत तसेच शासकीय संकेतस्थळावर निविदेकरीता अपलोड/सादर केलेले स्टॅम्पपेपर स्वतःच्या नावाची गोपनियता बाळगुन ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमुद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा प्रक्रीयेत सहभागी होता येणार नाही.

६. निविदाकारांनी निविदा संदर्भातील सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे आवश्यक व अनिवार्य आहे. तसेच निविदा इसारा/बयाणा रक्कम ई निविदा खरेदी किंमत याबाबतच्या दस्तऐवजाच्या मुळ प्रत स्वतःच्या नावाची गोपनियता बाळगुन ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमुद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा प्रक्रीयेत सहभागी होता येणार नाही.

७. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकारी सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

सही/-
(सं.स. पुजारी)
कार्यकारी अभियंता (विद्युत)
ठाणे विद्युत विभाग, सा.बां. विभाग, ठाणे

जिमाका/पालघर/जाहि ३१०/१५६/२०२४ दिनांक : ०६/०३/२०२४

11 TO 17 MARCH 2024 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 3/9/2024 9:26 PM Page 1



# जाहिरातबाजीसाठी जनतेच्या पैशांची उधळपट्टी का?

जनतेचा पैसा हा राजकारणासाठी उधळपट्टीचे एक माध्यम असते. कारण त्यांना विचारणारा कोणी नसतो. त्यामुळे या पैशाची कशीही आणि कितीही उधळपट्टी केली तरी राज्यकर्त्यांना काहीही फरक पडत नाही. मात्र हा पैसा कमी पडला, की मग कराच्या माध्यमातून जनतेवर बोजा टाकला जातो. वास्तविक वेगवेगळ्या मोठ्या प्रकल्पांच्या नावाखाली जो निधी मंजूर केला जातो, त्या निधीतील बराचसा पैसा हा पुढाऱ्यांच्या आणि कंत्राटदारांच्या खिशात जातो. पण त्याचा भुर्दंड मात्र जनतेला सोसावा लागतो. म्हणूनच यापुढे राज्यकर्त्यांच्या उधळपट्टीकडे जनतेने गांभीर्याने बघण्याची वेळ आली आहे. हे सगळं एवढ्यासाठी सांगितले जात आहे की, लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्र सरकारने जाहिरातीसाठी चक्क ८४ कोटी १० लाख ५० हजार रुपये मंजूर केले आहेत आणि जाहिरात बाजीला सुरुवात झालेली आहे. अर्थात हा सगळा पैसा जनतेच्या घामाचा असल्याने, त्यावर आक्षेप घेण्याचा पूर्ण अधिकार जनतेला आहे. बरं हा पैसा शासकीय योजनांसाठी किंवा जनतेच्या हिताच्या कामांसाठी जर खर्च झाला असता, तर लोकांचं काहीही म्हणणं नव्हतं. परंतु सरकारमध्ये बसलेल्या लोकांची जाहिरात बाजी करण्यासाठी जनतेच्या पैशाची उधळपट्टी का? हा जनतेचा प्रश्न आहे. महाराष्ट्र सरकारची सध्याची परिस्थिती खूप वाईट आहे. सरकारी नोकरांचा पगार देण्यासाठी राज्य शासनाला बँकेकडून ओव्हर ड्राफ्ट घ्यावा लागतो, यावरून राज्य सरकारच्या आर्थिक स्थितीची कल्पना येऊ शकते. राज्य सरकारवर प्रचंड कर्ज आहे. या कर्जाचे हप्ते द्यायला सरकारकडे पैसा नाही. असे असताना, मुख्यमंत्री राज्यभर फिरून याला या भागाला हजार कोटी, त्या भागाला पाच हजार कोटी, त्याला दहा हजार कोटी, अशा घोषणा करीत आहेत. पण वेगवेगळ्या विभागांना हजारो कोटी रुपये वाटण्या इतका राज्य सरकारकडे पैसा आहे का? हाच खरा प्रश्न आहे. पण पैसा नसताना लोकांना खोटी आश्वासन का दिली जाते आहेत? त्याचबरोबर जो पैसा उपलब्ध आहे त्याची उधळपट्टी का केली जाते? राज्य सरकारने फेब्रुवारी २०२४ ते मार्च २०२४ या एका महिन्यात जाहिरातींसाठी ८४ कोटी १० लाख ५० हजार रुपये तातडीने मंजूर केलेले आहेत. आणि हा पैसा वर्तमानपत्र, टीव्ही, रेडिओ, होर्डिंग, एलआयडी, बस, ट्रेन वॉलपेंट जाहिरातीवर खर्च केला जाणार आहे. यापैकी २० कोटी, प्रिंट मीडिया २० कोटी इलेक्ट्रॉनिक मीडिया, तर सदतीस कोटी ५५ लाख रुपये हे पेंटिंग, होल्डिंग, एलईडी, सोशल मीडिया डिजिटल यावर खर्च केले जाणार आहेत. हा सगळा जनतेचा पैसा आहे. त्यामुळे जनतेला विश्वासात घेण्यापूर्वीच अशा प्रकारची जाहिरातबाजी करून सरकारने जनतेचे कोणते हित साधले? याचे उत्तर द्यायला हवे. आजही कर्जबाजारी शेतकऱ्यांचे कर्ज माफ झालेली नाही. त्याचबरोबर दुष्काळ, अतिवृष्टी यामध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही. तसेच या महाराष्ट्रात जनहिताचे असे कितीतरी प्रकल्प आहेत, जे पैशाअभावी रखडलेले आहेत. उदाहरण जर द्यायचं झालं तर एसटी कामगारांना २०० कोटी रुपये द्यायला सरकारकडे पैसा नाही, पण जाहिरातीवर ८४ कोटी रुपयांची तातडीची उधळपट्टी करायला सरकारकडे पैसा आहे. ही जनतेची फसवणूक नाही का? त्यामुळे निवडणुकांच्या तोंडावर होणारी ही जाहिरात बाजी थांबायला हवी. जाहिराती करा पण तुम्ही तुमच्या पक्ष निधीतून करा व ज्यांना कोणाला अशा जाहिराती द्यायचे आहेत त्यांनी आपल्या खिशातल्या पैशातून जाहिराती करा. जनतेच्या पैशावर दरोडा का टाकताय? असा सवाल जनता करीत आहे आणि त्याचे उत्तर सरकारने दिले नाही, तर लोकसभा निवडणुकीमध्ये त्याची काय हालत लोक करतील हे सांगायची आवश्यकता नाही आणि जनतेचा पैसा म्हणजे बाप का माल वाटला का? कशासाठी ही पिळवणूक? कशासाठी ही उधळपट्टी? यातून लोकांना काय मिळणार आहे? त्याचे उत्तर द्या ना! जो पक्ष सत्ताधारी आहे त्या पक्षाच्या जाहिरात बाजीवर लोकांचा पैसा खर्च करून त्यातून जनतेचा काय फायदा याचे उत्तर लोकांना मिळायला हवे. ज्या जाहिराती दाखवल्या जात आहेत. त्यामध्ये मुंबई ते नागपूर दरम्यान बांधण्यात आलेल्या समृद्धी महामार्गाच्या जाहिरातीचा समावेश आहे. समृद्धी महामार्गाबाबत बोलायचे झाल्यास समृद्धी महामार्ग केवळ प्रशस्त आहे. पण सुरक्षेच काय? आत्तापर्यंत या महामार्गावर हजारो लोक अपघातात मेले आहेत. आणि याच असुरक्षित महामार्गाच्या जाहिराती केल्या जात आहेत. सरकारला याची जराही लाज वाटत नाही. अरे आपण कसली जाहिरात करतोय? जो महामार्ग लोकांसाठी मृत्यूचा सापळा बनलाय त्या महामार्गाची जाहिरात कसली करता? त्याचबरोबर जे काही प्रकल्प प्रस्तावित आहेत, जे होतील की नाही हे सांगता येत नाही, त्यांचीही जाहिरात सरकारकडून केली जाते. हा सगळा संतापजनक प्रकार आहे. तो कुठेतरी थांबायला हवा. कारण लोकांसमोर आज महागाईचा ज्वलंत प्रश्न आहे. लोकांच्या पैशातून जाहिरात बाजीवर उधळपट्टी करण्यापेक्षा, ज्या जीवनावश्यक वस्तू आहेत. त्यावरची सबसिडी कायम ठेवा किंवा वाढवा. जेणेकरून लोकांना जीवनावश्यक वस्तू स्वस्त दरात मिळतील. किंवा आरोग्य, परिवहन यासारख्या सेवा डेव्हलप करा. त्याच्यावर पैसा खर्च करा ज्याचा लोकांना फायदा होईल. हाच जर एखाद्या हॉस्पिटल्ससाठी खर्च करायचा असता किंवा जनहिताच्या इतर प्रकल्पासाठी खर्च करायचा असता, तर सरकारने तातडीने निधी मंजूर केला असता का? अजिबात नाही! असे कितीतरी सरकारी प्रकल्प निधी अभावी रखडलेले आहेत. पण त्याकडे लक्ष न देता जाहिरात बाजीवर काही तासात ८४ कोटी मंजूर करायचे आणि त्याची तातडीने अंमलबजावणी सुरू करायची. हा प्रकार भयानक आणि लोकांचे खिसे कापणार आहे. त्यामुळे लोकांनी अशा उधळपट्टीवर आवाज उठवणे गरजेचे आहे. जर आवाज उठवणे शक्य नसेल, तर आगामी लोकसभा निवडणुकीत या उधळपट्टी बद्दल, ज्यांनी उधळपट्टी केली आहे, त्यांना कायमचे घरी बसवण्याची शिक्षा देणे गरजेचे आहे.

# जिल्हा गुंतवणूक परिषदेअंतर्गत पालघर जिल्ह्यात २५० उद्योगांचे १५ हजार कोटीचे सामंजस्य करार!





**पालघर/प्रतिनिधी**

विकास आयुक्त (उद्योग) दीपेंद्रसिंह कुशवाह यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद टीमा हॉल, बोईसर, पालघर येथे संपन्न झाली. मॅग्नेटिक महाराष्ट्र २०२४ साठीची पूर्व तयारी म्हणून पाहिल्या जाणाऱ्या जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदे अंतर्गत पालघर जिल्ह्यात छोटया उद्योजकांपासून मोठ्या उद्योजकांपर्यंत तसेच बाजूच्या राज्यांतील उद्योजकांनीही गुंतवणुक करण्याकरिता पुढाकार घेतला. परिषदेमध्ये एकूण २५० प्रस्तावित उद्योगातून १५००० कोटी रुपये एवढ्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात येत आहेत. या गुंतवणुकीतून पालघर जिल्ह्यात २५००० नवीन रोजगार निर्मिती होणार आहे. सदर परिषदेला संबोधित करत असताना जिल्हाधिकारी श्री.बोडके यांनी सांगितले की पालघर जिल्ह्यातील उद्योग वाढीसाठी पोषक वातावरण निर्मिती करण्याची प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे उद्योगांना कोणतीही मदत आवश्यक असल्यास जिल्हा प्रशासन सदैव तत्पर असेल. यावेळी जिल्हाधिकारी श्री.बोडके आणि उद्योग सह संचालक, कोकण विभाग यांनी सामज्यस्य करार करण्यात येणाऱ्या उद्योजकांचे स्वागत व अभिनंदन केले कोकण विभागाच्या सह संचालक विजू सिरसाठ यांनी गुंतवणुक परिषद आयोजनाबाबतची भूमिका व उद्देश याची माहिती देताना जिल्हास्तरावर गुंतवणुक आकर्षित करणे, गुंतवणुकदार आणि व्यवसायांना एकत्रित व्यासपीठ उपलब्ध करुन देणे आणि जिल्हयांना केंद्रबिंदु मानून जिल्हयाच्या व राज्याच्या विकासाला चालना देणे हा या परिषदेचा उद्देश असल्याचे सांगितले. या परिषदे अंतर्गत गुंतवणुक आकर्षित करण्यासाठी करण्यात येत असलेल्या सामंज्यस्य कराराच्या माध्यमातून गुंतवणुकदारांना उद्योग विभाग, जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून आवश्यक परवानग्या व शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी प्रत्येक टप्प्यावर मदत करण्यात येणार आहे. तसेच उद्योग विभागाच्या विविध पुढाकारांबाबत उपस्थिताना मार्गदर्शन केले. नजीकच्या काळात संपन्न झालेल्या महा-डिफेन्स एक्स्पो, राज्यस्तरीय निर्यात पुरस्कार, इग्नाईट महाराष्ट्र इत्यादी कार्यक्रमांची माहिती उपस्थित उद्योजकांना दिली. तसेच समूह विकास योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मीती योजना, उद्योग धोरण इत्यादी बाबत मार्गदर्शन केले. तसेच उद्योग विभागाकडून उद्योजकांना शासनाच्या विविध योजनांतर्गत फायदा घेण्याबाबत मार्गदर्शन व वेळोवेळी सहाय्य करण्यात येत असल्याचे आवर्जून सांगितले. जिल्हा उद्योग केंद्र पालघरचे महाव्यवस्थापक उपेंद्र सांगळे यांनी महाराष्ट्र पॉलिसी लँडस्केप बाबत सादरीकरण केले. लालबहादूर कटारे, सह आयुक्त, राज्य वस्तू व सेवा कर व मैत्री कक्षाचे नोडल अधिकारी यांनी महाराष्ट्र शासनाच्या मैत्री कायदा, इज ऑफ डुईंग बिजनेस व एक खिडकी योजना याबाबत सादरीकरणे केले. या जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदे मध्ये नरेश देवराज, सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, दिनेश पाटील, सहाय्यक आयुक्त, मस्त्य व्यवसाय, मुकेश लांजेवार, उप अभियंता एम.आय.डी.सी. कुमार परमार, संचालक , सेंट जॉन कॉलेज, प्रवीण खानविलकर, अध्यक्ष, औद्योगिक सहकारी वसाहत पालघर, रवींद्र ठाकूर, उपाध्यक्ष टीमा संघटना, विक्रांत पाटील, जिल्हा अग्रणी बँक, प्रणव झुंजारराव, वरिष्ठ सल्लागार इ. वाय. टीम इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या परिषदे मध्ये विराज प्रोफाइल (८०५० कोटी), एस. एस. पी. एंटरटेनमेंट वर्ल्ड एल. एल. पी. (२०० कोटी), लॅक्सोन स्टील लिमिटेड (२५० कोटी), छेडा फूड्स (२०० कोटी), आरती ड्रग्स लिमिटेड (१५० कोटी), डी डेकोर (१०० कोटी), दमानी कास्टिंग (१०० कोटी), विस्तार अलोय्ज (५० कोटी), रोहन फूड इंडस्ट्री (३० कोटी), पालघर फर्नीचर क्लस्टर (२० कोटी), बी. आय. सी. केमिकल्स (२० कोटी), आरे पॅकेजिंग (५ कोटी), ग्रीन फॉईल ॲग्रो (१ कोटी) इत्यादी उद्योगांशी प्रातिनिधिक स्वरूपात सामंजस्य करार करण्यात आले. या गुंतवणुक परिषदेच्या माध्यमातून जिल्हयात येत असलेल्या प्रस्तावित गुंतवणूक लवकरात लवकर प्रत्यक्षात उतरण्याची आशा उद्योग क्षेत्रातील सर्व स्तरांमधून करण्यात येत आहे. श्री. खिराळे, व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र पालघर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# एक बहारदार सेक्सोफोनिस्ट स्व.मनोहारी सिंह

कोणताही कलाकार हा आपल्या असामान्य कलेने गणला जातो. कारण त्याने त्या कलेत विशेष प्रावीण्य मिळवलेले असते.हा कलाकार नेहमीच आपल्या कलेच्या आधारे लोकांचं मनोरंजन करतो. मग ते क्षेत्र कोणतहीअसो. असा एक आसिम कलाकार संगीत वाद्य दुनियेचा पाहूया. ज्याने आपल्या खास वाध्याने फिल्मी संगीत गाजवले व अनेक नामवंत संगिकारांचे ते फरिशते बनले, असे हे अवलिया कलाकार, म्हणजेच सेक्सोफोनिस्ट स्व.मनोहारी सिंग.

स्व.मनोहारी सिंह यांचा जनम १९३१ साली कलकत्ता येथे ब्रिटिश राजवटीत झाला. ते नेपाळी कुटुंबातील होते. पण संगीत वाद्यांचा वारसा त्यांना त्यांच्या घरातूनच मिळाला. कारण त्यांचे वडील व काका हे बाटा नगरातील ब्रास बॅनडचे प्रतिनिधी होते व आपली सेवा देत होते. त्यामळे मनोहारीजीना वाद्यांची आवड लागली. तेही मग बाटा पथकात सामील झाले. त्यावेळी त्यांचे प्रशिक्षक स्व.जोसेफ न्यूमन हे होते, ते हंगेरियन होते. नंतर १९४५ न्यूमन ह्यांनी एच.एम.वी. कंपनीत आपला जम बसवला. नंतर ते ऑट्रेलियात स्थायिक झाले. मग मनोहरजिंनी त्या पथकाची जबाबदारी आपल्याकडे घेतली आणि अनेक वाध्यांवर आपली हुकूमत मिळवली. मग त्यांनी हळूहळू आपला मोर्चा हिंदी फिल्मी दुनियेत वळवला.ते बांसरिही सुंदर वाझवायचे. पण सेक्सोफोन हा त्यांचा हुकमी एक्का होता. त्यांनी शास्त्रीय संगीतालाही साथ दिली. मग संगीतकार स्व.सलील चौधरी ह्यांच्या संपर्कात



आले व मनोहारी सिंग ही त्याचच देणं आहे.कारण सलिलजिंनीच त्यांना मुंबईत आणल. त्यामुळे मोठ्या व महान संगितकारांशी त्यांचा समंध आला व त्या दिग्गजन बरोबर त्यांना काम करायला मिळाले. तत्पूर्वी त्यांनी स्व.संगीतकार कमलदास गुप्ता, एस. डी. बरमन, तीमिर बरान,रवी शंकर ह्यांच्या बरोबर कामे केली. तर कलकत्ता येथे सिंफनी वाद्य वृंदात ही होते. कारण त्या वाद्य वृंदाचे सर्वेसर्वा व आयोजक फ्रान्सिस्को होते. हा संनच हॉटेल फिरपोस येथे वाजवायला असायचा. तर कलकत्ता नाईट क्लबमध्ये मनोहारी हे बासरी, क्लारेनेट आणि मेंडोलिनेही वाजवायचे. मग त्यांनी सेक्सोफोने व्यवस्थित शिकून घेतल्यावर, मग ते नाईट क्लबमधे वाझवू लागले. त्यांना योग्य संधी १९५८ साली एस.डी. बर्मन ह्यांनी सेक्सोफोनीस्त म्हणून दिली. तो चित्रपट होता सितारोंसे आगे.नंतर अनेकान बरोबर त्यांनी कामे करताना, खास आर. डि. अर्थात पनमचामदा बरोबर त्यांनी सिनेमात बहारदर संगीत दिले. मग ते पंचदांनचे आयोजकही बनले. बहारदार गीतांना संगीत देत त्यांच्या भरपूर आठवणी आहेत. अभावाने देता येत नाहीत. मग त्यांनि सॅक्स आपील नावाचा अल्बमही काढला. मग तांनी १९६९ साली सोनेरी रंगाचा, एक सेक्सोफोनहीं न्यूयॉर्क येथून आणला होता तो त्यांनी शेवटपर्यंत जपला होता. त्यावर ते आपल्या बोटांचे ठसेही उमटू डेट नसतं, हे विशेष! अनेक दिग्गज नटांना मध्यपान विरहामध्ल्या गित्तांना अचूक साथ दिली. हवेच्या दाबावर चालणाऱ्या वाद्य वाजवणारे ते एकमेव पारंगत कलाकार होते. कोंबडी बजाही व ट्रमपेटही ते चांगले वजवयचे. कांहीं सिनेमात त्यांनी अनेक वाद्यांचा एकत्रित वापर केलेला आहे, हे खास आहे. पनचमदासाठी, त्यांचे सहकारी चकरवरती व राव ह्यांच्या बरोबर त्यांनी धमाका केला. हे करताना मनोहारीनच्या पत्नीने योग्य साथ दिली. शेवटची १० वरशे त्यांनी ही आपली कला अनेक वाद्य वृंदात रसिकांसाठी पेश केली. शेवटी आजारी असताना, त्यांना रेडिओ मिरची हा किताब मिळाला. २७ मार्च २००९ रोजी त्यांना ७५व्या वर्षी अविरत संगीत सेवा पुरस्काराने सन्मानित कार्यात आले. मनोहारी ह्यांचे निधन १३ जुलै १९१० रोजी झाले. विशेष म्हणजे ही बातमी ब्रिटनच्या द इंडिपेंडंट ह्या आंतराष्ट्रीय बर्तमान पत्रात जास्त लिहून आली. त्यामध्ये पनचमदा सोबत त्यांनी सुरु केलेलं पर्व हे खास होते. ह्या सेक्सोफोनच्या आधारे, त्यांनी अशक्य गोष्टी शक्य केल्या. त्यांची मुले राजेश व डॉली ही सुद्धा वडिलांच्या पायावर पाय ठेवून, संगीताची निस्सीम सेवा करी आहेत. अशा ह्या सुवर्ण काळच्या सेकॉफोनिस्टला मानाचा मुजरा!

# नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीस्थळ व परिसराच्या सुशोभीकरणासाठी १० कोटींचा निधी देणार –एकनाथ शिंदे

**रायगड/प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा, पराक्रमाचा वारसा असलेल्या गडकिल्लयांचे संवर्धन राज्य शासनामार्फत केले जात आहे. तसेच स्वराज्य निर्मितीसाठी प्राणपणाने लढलेल्या मावळ्यांच्या कार्यातून पुढच्या पिढीला प्रेरणा मिळावी, म्हणून ऐतिहासिक स्थळांचा, गावांचा विकास केला जात आहे. या अंतर्गत उमरठ येथील नरवीर तानाजी मालुसरे' यांच्या समाधीस्थळाचे सुशोभिकरण आणि परिसराचा विकास करण्यासाठी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले. तसेच या परिसराचा विकास करण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. पोलादपूर तालुक्यातील उमरठ येथे नरवीर तानाजी मालुसरे यांच्या ३५४ व्या पुण्यतिथीनिमित्त नरवीर तानाजी मालुसरे यांचे समाधीस्थळ व परिसर सुशोभिकरण कामाचा आरंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज दूरदृष्य संवाद प्रणालीद्वारे करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, (ऑनलाईन), उद्योगमंत्री तथा पालकमंत्री उदय सामंत, खासदार सुनिल तटकरे, आमदार भरत गोगावले, जिल्हाधिकारी किशन जावळे, ज्येष्ठ इतिहासकार आप्पासाहेब परब, स्थानिक समिती अध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या समाधीस्थळाचे सुशोभिकरण होणार असून यामध्ये शिवकालीन जननी कुंभळाजाई मंदिराचे सुशोभिकरण, समाधी प्रवेशद्वाराजवळच्या कमानीचे बांधकाम, बुरुजाचे बांधकाम, प्रसाधनगृहे, अंतर्गत रस्ते काँक्रीट गटार, कंपाउंड वॉलचे बांधकाम ही कामे करण्यात येणार आहेत. उमरठच्या ऐतिहासिक भूमीत नरवीर तानाजी मालुसरे आणि त्यांच्या समवेत कोंढाणा किल्लयावरील लढाईत लढलेल्या शेलार मामा यांची समाधी आहे. या दोन्ही शूरवीरांना अभिवादन करुन मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांना तानाजी मालुसरे यांनी दिलेली साथ आणि आधी लगीन कोंढाण्याचं मग रायबाचं'..ही घोषणा इतिहासात अजरामर आहे. स्वामीनिष्ठेचा जगापुढे ठेवलेला आदर्श हा इतिहास कधीही विसरू शकणार नाही. राज्य शासनामार्फत छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभलेल्या गड-किल्लयांचे संवर्धन करण्यात येत आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात राज्यातील ३२ शिवकालीन गड-किल्लयांचे संवर्धन करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच रायगडाच्या पायथ्याशी पाचाड येथे उभारण्यात येणाऱ्या शिवसृष्टीसाठी ५० कोटी देखील मंजूर केले आहेत. या सर्व कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्य शासनामार्फत आग्र्याला देखील छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात येत आहे. याबरोबरच स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे तुळापूर येथील बलिदान स्थळ आणि शिरूरच्या वढू येथील समाधीस्थळी भव्य स्मारक उभारण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातील पोलादपुर तालुका दुर्गम आणि डोंगराळ आहे. या भागातील युवकांचे रोजगारासाठीच्या स्थलांतराचे प्रमाण अधिक आहे. हे लक्षात घेवून या भागातील पर्यटन विकासाला चालना देवून स्थानिक ठिकाणी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. पालकमंत्री उदय सामंत म्हणाले की, शिवकालीन इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य शासनाने हे ऐतिहासिक पाऊल उचलेले आहे. नरवीर तानाजी मालुसरे यांचे समाधीस्थळ आणि परिसराचे सुशोभिकरण करताना त्यांच्या वाड्याचे देखील या निधीमधनू सुशोभिकरण करण्यात येईल असे जाहीर केले. तसेच या परिसरातील जिल्हा परिषदेच्या विश्रामगृहाचे देखील जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीमधून प्राधान्याने नूतनीकरण करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या. यावेळी खासदार सुनिल तटकरे यांनी या भागाच्या विकासासाठी राज्य शासनामार्फत प्रभावी उपाययोजना करण्यात येत असल्याचे सांगितले. प्रास्ताविक आमदार भरत गोगावले यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पालकमंत्री उदय सामंत आणि उपस्थित मान्यवरांनी नरवीर तानाजी मालुसरे आणि शेलारमामा यांच्या समाधीस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तसेच यावेळी ज्येष्ठ इतिहासकार आप्पासाहेब परब यांना शौर्य पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांची बग्गीतून मिरवणुक!

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

रस्त्याच्या दुतर्फा गावातील महिलांची शिस्तबद्ध रांग...प्रत्येकाच्या हातात रंगीबेरंगी फुले...पारंपारिक वाद्यांचा कडकडाट... फटाक्यांची आतषबाजी अन् मिरवणुकीत सहभागी प्रत्येक ग्रामस्थांच्या चेहऱ्यावरचा आनंद..! अशा या प्रसन्न वातावरणात जागतिक महिला दिनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांची बग्गीतुन मिरवणुक व जेसीबीतून मुक्त फुलांची उधळण करत चपळगांव ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी नागरी सन्मान केला. जागतिक महिला दिन व महाशिवरात्रीच्या निमित्त चपळगाव ता.अक्कलकोट येथील ग्रामस्थांनी अनोख्या पद्धतीने महिला दिन साजरा केला व संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच वर्षा भंडारकवठे होत्या. तर यावेळी सेवानिवृत्त अंगणवाडी पर्यवेक्षिका सुनंदा राजेगावकर, प्रा.डॉ.शिला स्वामी, रिणाती संस्थेच्या सचिवा रोहिणी पाटील, ग्रामपंचायत सदस्या रेशमा तांबोळी, वंदना कांबळे,

## जागतिक महिला दिनी चपळगांवकरांनी केला अनोखा नागरी सन्मान



वर्षा सोनार, चित्रकला कांबळे, गंगाबाई वाले, डॉ.लता रणखांबे, शोभा गजधाने, कोंडाबाई कांबळे विस्तार अधिकारी पंचायतचे युसुफ पठाण, तालुका वैद्यकीय अधिकारी आश्विन करजखेडे, आरोग्य विस्तार अधिकारी महेश भोरे, ग्रामसेवक सोमलिंग कणगी, परमेश्वर बिराजदार, श्रीधर नडीमेटला, डॉ.मनिष उमराणीकर, पोलिस पाटील विवेकानंद हिरेमठ, आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवक-सेविका, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका-मदतनीस, जिल्हा परिषद शाळेचे कर्मचारी, बचत गटाचे सदस्य व चपळगाव, बावकरवाडीतील महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व प्रार्थना घेण्यात आली. यावेळी महिला सक्षमीकरण याबाबत मनोगत व्यक्त करताना सुनंदा राजेगावकर, रोहिणी पाटील व शिला स्वामी यांनी प्रत्येक घरातील महिलांनी सबला बनण्याचे आवाहन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंभुलिंग अकतनाळ यांनी तर आभार डॉ.विजयालक्ष्मी भंडारकवठे यांनी मानले.

दरम्यान मी चपळगांवचीच लेक समजुन केलेला सन्मान खरोखरच लाखमोलाचा आहे.महिला दिनानिमित्त एखाद्या खेडेगावात नागरी सन्मान होणे मोलाचे आहे.परंतु चपळगाव वासियांनी आपल्याच गावातील मुलगी मोठ्या हुद्द्यावर गेली आहे व तिचा नागरी सन्मान करणे हे प्रत्येकाचं कर्तव्य समजून गावातून मिरवणूक काढून माझा सन्मान केला हे मी माझे भाग्य समजते. या सन्मानाने मी भावनिक झाले, असे मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी आपले मत व्यक्त केले. तसेच आपल्या घरातील मुलींना तिची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रत्येक आई-वडिलांनी बळ देण्याची गरज आहे आणि मुलींनीही इतरांपेक्षा वेगळी स्वप्ने पाहिली पाहिजेत व ती पूर्ण करण्यासाठी जिद्द व चिकाटी ठेवून स्वप्न साध्य केले पाहिजे.यासाठी कष्टाची तयारी असावी. पालकांनी आपल्या मुलींना त्यांची स्वप्ने साध्य करण्यासाठी शिस्तीची जोड देऊन स्वातंत्र्य दिले पाहिजे अशी अपेक्षा मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी व्यक्त केली.

# भिवंडीत संकेत भोसले हत्यकांड, वंचित आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकरांनी केले कुटुंबियांच्या सांत्वन



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडीतील संकेत भोसले हत्याकांडातील पीडित भोसले परिवाराच्या सांत्वनाला वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी बुधवारी रात्री उशिरा भिवंडी शहरात भेट देत वंचित बहुजन आघाडी पीडित कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी कटिबध्द असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले.

यावेळी परिसरातील नागरिकांसह तालुक्यातील शेकडो नागरिक कामतघर वराळदेवी नगर परिसरात उपस्थित झाले होते. यावेळी वंचित आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकूर व असंख्य कार्यकर्ते हजर होते. भिवंडीत अपहरण करून १४ फेब्रुवारी रोजी अपहरण करून मारहाण झाल्याने उपचारा दरम्यान मृत्यू झालेल्या संकेत भोसलेंच्या हत्येचे पडसाद भिवंडी शहरासह राज्यात अनेक भागात आंबेडकरी जनतेमध्ये उमटले आहेत. बुधवारी रात्री बारा वाजताच्या सुमारास मयत संकेत भोसले याच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर हे भिवंडी शहरात दाखल झाले त्यावेळी मध्यरात्रीचा वेळ असताना सुद्धा प्रकाश आंबेडकर येणार असल्याने रात्री दहा वाजता पासून ते भेट देण्यात आलेल्या वऱ्हाळदेवी नगर येथील बौद्ध विहारा बाहेर हजारोंच्या संख्येने आंबेडकरवादी जनता मोठ्या संख्येने उपस्थित झाली होती.

# महामार्गावर गाडीला अचानक लागली आग; प्रसंगावधानामुळे प्रवासी सुखरूप

**पालघर/प्रतिनिधी**



मुंबईकडून गुजरातकडे जात असलेल्या गाडीला पालघर तालुक्यातील सोमटा गावच्या जवळ आग लागली. गाडीमधील प्रवाशांनी प्रसंगावधान दाखविल्याने प्रवासी सुखरूप बाहेर पडले. दोन महिला व दोन पुरुष प्रवास करणाऱ्या आपल्या गाडीला आग लागल्याचे लक्षात येताच या प्रवाशांनी गाडीतून खाली उतरून घेतले. आपल्या नातेवाईकांना भेटण्यासाठी मुंबईला आले होते. परतीच्या प्रवासादरम्यान ७.३० वाजल्यानंतर गुजरातकडे जाताना ही घटना घडली. सर्वांनी प्रसंगावधान दाखवत गाडीतून उतरल्याने अनर्थ टळला. महामार्गावरच गाडीने आग पकडल्याने महामार्गावरील वाहतूक एक तास विस्कळीत झाली होती. महामार्गाचे काँक्रीटीकरण सुरू असल्याने पाण्याचे टँकर जवळच होते. त्यामुळे टँकरच्या पाण्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला गेला परंतु त्यात यश आले नाही. त्यामुळे या आगीमध्ये गाडी पूर्णपणे जळून खाक झाली. महामार्गाचे काँक्रीटीकरण सुरू असल्याने अगोदरच वाहतूक कोंडी होत आहे. त्यातच हा अपघात झाल्याने वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

# विवा महाविद्यालयात गर्भाशयाच्या कर्करोगाच्या लसीकरण शिबिराचे आयोजन

**विरार/प्रतिनिधी**




कर्करोग म्हटलं की मनात भीती निर्माण होते. जगभरातील स्त्रियांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग म्हणजे सर्व्हायकल कॅन्सर हा खूप चिंतेचा विषय आहे. स्त्रियांमध्ये सामान्यत: हा कर्करोग चौथ्या क्रमांकावर आहे. संपूर्ण जगात जानेवारी महिना सर्व्हायकल कर्करोगाबाबत जागृती महिना म्हणून पाळला जातो. साधारण हा कर्करोग ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस (HPV) यामुळे होतो.

आज या कर्करोगापासून वाचण्यासाठी लस निर्माण झाली आहे. मात्र या लसीबद्दल हवी तशी जनजागृती झाली नाही. ह्याच पार्श्वभूमीवर कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशन, विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट विरार, पालघर अकॅडमी ऑफ पीडीअट्रिक्स, विरार मेडिकल असोसिएशन, यंग स्टार्स ट्रस्ट, विरार आणि भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ४ मार्च २०२४ रोजी ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस (HPV) वॅक्सिनेशन कॅम्प विरार पश्चिमेच्या विवा महाविद्यालयाच्या नवीन इमारतीमध्ये घेण्यात आला. गर्भाशयाच्या कर्करोगाच्या लसीकरण शिबिराच्या आयोजनासाठी विरार मेडिकल असोसिएशन तसेच यंग स्टार्स ट्रस्ट विरार ह्यांनी उत्तम नियोजन केले होते. भानुताई गडकरी ग्रामीण विकास संस्थेच्या माध्यमातून लस उपलब्ध करण्यात आली आणि कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशनच्या सहकार्याने विवा महाविद्यालय, उत्कर्ष कनिष्ठ महाविद्यालय, उत्कर्ष मराठी आणि इंग्रजी माध्यम शाळेतील जवळपास १३०० मुलींना हे लसीकरण देण्यात आले. सदर लसीकरण शिबीराचे यशस्वी आयोजन करण्यासाठी डॉ. प्रवीण क्षीरसागर, डॉ.शैलेश बारुड तसेच विरार मेडिकल असोसिएशनची संपूर्ण टीम आणि यंग स्टार्स ट्रस्ट समन्वयक अजीव पाटील ह्यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेचे माजी नगरसेवक हार्दिक राऊत आणि इतर सर्व पदाधिकारी ह्यांनी आयोजन आणि नियोजनामध्ये सहभाग घेतला.

# पाच हजाराची लाच घेताना पोलीस शिपाईला केले गजाआड

**सोलापूर/प्रतिनिधी**

तक्रारदार वापरत असलेला मोबाईल चोरीचा असल्याचे सांगून त्याच्याविरुद्ध मोबाईल चोरीचा गुन्हा दाखल न करण्याकरिता पाच हजार रुपये लाच स्वीकारत असताना अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यामधील पोलीस शिपायास लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने सापळा रचून अटक केली. आरोपी पोलीस शिपाई दादासाहेब श्रीमंत बोडके (वय ३२) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. तक्रारदार हे वापरत असलेला मोबाईल चोरीचा असल्याचे सांगून तक्रारदाराविरुद्ध मोबाईल चोरीचा गुन्हा दाखल न करण्याकरिता पोलीस कर्मचारी दादासाहेब बोडके यांनी तक्रारदाराकडे पाच हजार रुपयांची लाचेची मागणी केली. दरम्यान तक्रारदाराने याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे केली पथकाने सापळा रचला सदरची लाचेची रक्कम स्वीकारताना पोलिसाला रंगेहात पकडण्यात आले. लाचलुचपतचे पोलीस उपअधीक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक, पोलीस अंमलदार अतुल घाडगे, स्वामीराव जाधव, राहुल गायकवाड यांनी केले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, भ्रष्टाचारा संबंधित काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

# नागतिर्थवाडी येथे महिला दिनानिमित्त महिलांचा सन्मान



**देवणी/प्रतिनिधी**

आठ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त नागतिर्थवाडी तालुका देवणी जिल्हा लातूर येथे ग्राम पंचायत कार्यालय मार्फत महिलांसाठी असणाऱ्या विविध शासकीय योजनाची माहिती, महीला जीवन विमा, गृहउद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, बचतगट अनुदान, बचतगट कर्ज योजना, बाल विवाह मुक्त अभियान, महिलांसाठी सामजिक व शारीरिक सुरक्षा यांची सविस्तर अशी माहिती देण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली, बाल विवाह मुक्त अभियानाची शपथ घेण्यात आली आणि गावातील महिला सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या महिला सन्मान म्हणून CRP, FLCRP, आरोग्य सखी, ग्राम संघाच्या अध्यक्ष, लिपिक, बचत गटाच्या अध्यक्षा व सचिव यांचा शाल व हार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी गावचे माजी सरपंच राज गुणाले, सरपंच कोमल गुणाले, ग्रामसेवक श्यामसुंदर क्षीरसागर, ग्राम पंचायत सदस्य स्वाती कासले तर मार्गदर्शक म्हणून देवणी पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक माणिक डोके व दक्षता समितीच्या तालुका समन्वयक रंजना पोलकर आणि गावातील महीला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.


# शेतामध्ये लावलेल्या विद्युत तारेचा स्पर्श होऊन आई व मुलाचा दुर्दैवी मृत्यू

**बोईसर/प्रतिनिधी**



बोईसर जवळील शिगाव खुताड येथे जंगली प्राण्यांपासून संरक्षणसाठी लावलेल्या विजेच्या तारेचा स्पर्श होऊन आई आणि मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. बोईसर जवळील शिगाव खुताड येथे असलेल्या मिरचीच्या वाडीमध्ये एक परप्रांतीय कुटुंब काम करत होते. त्यांनी शेतीचे रानडुकरापासून संरक्षण व्हावे यासाठी विजेची तार लावली होती. आज संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास या विजेच्या तारेला स्पर्श होऊन मुलगा ओमप्रकाश कन्हैया सहानी आणि त्याला वाचवायला गेलेल्या त्याची आई ललिता देवी कन्हैया सहानी यांचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेची माहिती मिळताच बोईसर घटनास्थळी पोहोचले असून या प्रकरणी पंचनामा व अधिक चौकशी करीत आहेत. पालघर जिल्ह्यात बागायती शेतीमध्ये रानडुकरांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात होत आहे. रानडुकरांच्या उपद्रवामुळे बागायती शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने पिकांच्या संरक्षणासाठी काही शेतकरी कुंपणाला बेकायदा विद्युत प्रवाह जोडणी लावण्याचे प्रकार करत असतात.

# महिलांचा आदर सत्कार हीच भारतीय संस्कृती -गजानन शिंदे



**देवणी/प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने देवणी तहसील कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्तबगार महिलांचा देवणी चे तहसीलदार गजानन शिंदे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यावेळी महिलांना मार्गदर्शन करतांना महिलांचा आदर सत्कार करणे हीच भारतीय संस्कृती आहे म्हणून महिलांचा सन्मान व्हावा त्यांनी करीत असलेल्या कार्याला प्रेरणा मिळावी म्हणून सत्कार करणे काळाची गरज असल्याचे ही यावेळी सांगितले.

१९७५ साली या जागतिक महिला वर्षाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याच ठरविलं १९७७ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या समितीनं विविध सदस्यांना आमंत्रित करून ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांचे अधिकार आणि जागतिक शांतता या हेतूने साजरा करावा यासाठी आव्हान केले म्हणून महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या समर्थनार्थ दर वर्षी ८ मार्च हा दिन साजरा करण्यात येत असल्याचे या प्रसंगी सांगितले. यावेळी तहसीलदार गजानन शिंदे, नायब तहसीलदार राहुल पत्रिके, पेशकार माधवराव साळुंके, अव्वल कारकून रितेश कवरे, पदमसिंग गोटमुकले क्लार्क सुग्रीव बिरादार श्रीमती अनुजा पानसरे, भाग्यश्री सूर्यवंशी, भाग्यश्री मोघे, अनुराधा विभूते, कोळे मॅडम यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

# विरारमधील खाद्य महोत्सवाला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद

**विरार/प्रतिनिधी**

यंग स्टार्स ट्रस्ट आयोजित विरार येथील पहिल्या खाद्य महोत्सवाचे भव्य आयोजन येथील एस.टी.डेपो नजिक मैदानात करण्यात आले होते. यावेळी महिला बचत गट चालविणार्या असंख्य महिलांनी आपले खाद्य पदार्थाचे व कलात्मक वस्तुंचे स्टॉल लावले होते. १ ते ३ मार्च असे तीन दिवस हा खाद्य महोत्सव भरविण्यात आला. त्याला परिसरातील नागरीकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. खमंग पदार्थ व मांसाहारी पदार्थ, भाकरी अशा अनेक खाद्य पदार्थांना लोकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. या महोत्सवात ज्यांच्याकडे कला गुण आहेत व आपल्या हस्त कौशल्याने लोकांच्या आवडीच्या खाद्य पदार्थ तयार करुन विकण्याचा गुण आहे. अशांना या महोत्सवाचा चांगलाच फायदा झाला. स्थानिक परिसरात स्त्रियांना व लोकोपयोगी वस्तु बनवून विक्री करणाऱ्या लोकांना चांगलाच फायदा झाला. बहुजन विकास आघाडीचे संघटक सचिव अजीव पाटील, स्थानिक नगरसेवक हार्दिक राऊत, भूषण चुरी, वृंदा मयेकर, स्मिता सावंत यांनी महोत्सवाचे संयोजन केले.

# सायकल रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद; जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दाखविली हिरवी झेंडी

**लातूर/प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लातूर जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय आणि लातूर आयएमए वूमन्स डॉक्टर विंगच्यावतीने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून रॅलीला सुरुवात झाली. विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा परिषदेच्या महिला बालकल्याण विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, उपशिक्षणाधिकारी क्षीरसागर, आयएमएचे अध्यक्ष डॉ. अनिल राठी, वूमन्स डॉक्टर विंगच्या अध्यक्ष डॉ. प्रीती बादाडे, डॉ. प्रियांका राठोड, डॉ. अशोक सारडा, डॉ. पाठक, लातूर सायकलिस्ट क्लबचे अध्यक्ष विष्णू मदने, सचिव संदेश महिंद्रकर, सायकल बड्डीजचे विकास कातपुरे, मॉम्स ऑन व्हीलच्या डॉ. विमल डोळे





उपस्थित होत्या. स्त्री भ्रूणहत्या विरोधी जनजागृती, सुरक्षित मातृत्व व महिलांच्या आरोग्याबाबत संदेश देण्यासाठी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. देशिकेंद्र विद्यालय, केशवराज विद्यालयातील विद्यार्थिनी, ज्ञानप्रकाश बालविकास केंद्राचे ढोल पथक या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून पीव्हीआर चौक, महात्मा गांधी चौक ते पुन्हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आल्यानंतर रॅलीचा समारोप झाला. शारीरिक आणि मानसिक आरोग्य हे प्रत्येकासाठी महत्वाचे आहे. त्यामुळे महिलांनी आपल्या जबाबदाऱ्या सांभाळताना आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये. आरोग्याचे महत्व पटवून देण्यासाठी आयोजित सायकल रॅलीमुळे महिलांमध्ये जनजागृती होईल. त्यामुळे त्यांच्या आरोग्य आणि प्रगतीचे चाक गतिमान होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी व्यक्त केला. तसेच महिलांनी आयुष्यात आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्न करताना आपल्याला येणाऱ्या चांगल्या-वाईट अनुभवासह खंबीरपणे वाटचाल करावी, असे त्यांनी सांगितले. समाजाची प्रगती महिलांच्या प्रगतीशिवाय अपूर्ण आहे. त्यामुळे महिलांच्या प्रगतीसाठी सर्वांनीच प्रयत्न करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले यांनी प्रास्ताविकात सांगितले. तसेच रॅलीच्या आयोजनाचा हेतू त्यांनी विषद केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आंनद कलमे यांनी केले. डॉ. माधुरी उटीकर, ॲड. श्रीमती मेकले, जयश्री सागावे, अनिल कुंभारे, दिपक पवार, संध्या शेडोळे, हिराकांत थिटे, कैलास स्वामी यांनी यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

11 TO 17 MARCH 2024 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 3/9/2024 9:27 PM Page 1



# स्व. हिरालाल जैन यांच्या स्मृतिदिनानिमित्त जैन इरिगेशनच्या रक्तदान शिबिरात ४१६ सहकाऱ्यांचे रक्तदान

**जळगांव/प्रतिनिधी**

जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष स्व. भवरलाल जैन यांचे वडील स्व. हिरालालजी जैन अर्थात बाबा यांच्या ३४ व्या स्मृतिदिनी आयोजित रक्तदान शिबिरात ४१६ रक्त बॉटल चे संकलन झाले. इंडियन रेडक्रॉस सोसायटी, केशव स्मृति प्रतिष्ठान संचलित स्व. माधवराव गोळवलकर स्वयंसेवी रक्तपेढी, सिव्हिल हॉस्पीटल जळगाव या संस्थांनी रक्त संकलन केले. स्व. हिरालालजी जैन यांच्या स्मृतिंना अभिवादन व त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी जैन इरिगेशनच्या सहकाऱ्यांनी दरवर्षी रक्तदान करण्याचा संकल्प घेतला आहे. कंपनीतील सहकाऱ्यांनी रक्तदान करून गरजूंची रक्ताची गरज भागवून सकारात्मकतेच्या दिशेने पाऊल उचलले आहे. दिवसभर असलेल्या रक्तदान शिबिरात जैन प्लास्टिक पार्क येथे २०५, जैन



फूडपार्क येथे १५२, अल्वर ०३, बडोदा १९, चित्तूर १६, हैद्राबाद ११ आणि उदमलपेठ १० असे रक्त बॉटल चे संकलन झाले. मानवी रक्त हे गरजवंत व्यक्तीच्या जीवन-मरणाशी निगडित असते. आपल्या रक्ताच्या एका थेंबामुळे जर कुणाचाही जीव वाचण्यास मदत होत असेल, तर आपला जन्मही कृतार्थ होत असतो. आपल्या कंपनीने सुरु केलेल्या रक्तदानाच्या मोहिमेमुळे सामाजिक कार्यात हातभार तर लागतोच, तसेच आपण दरवर्षी केलेल्या रक्तदानामुळे अनेकांचे प्राण वाचले असतील ही सुखद अनुभूती व समाजाचे ऋण फेडण्यास हातभार लागल्याची भावनाही रक्तदात्याच्या मनात नेहमी राहत असते अशी भावना कंपनीच्या सहकाऱ्याची आहे. जैन प्लास्टिक पार्क डेमो हॉल येथे सकाळी ८ वाजता औपचारिक आगळे वेगळे उद्घाटन झाले. कालच जागतिक महिला दिवस साजरा झाला त्या निमित्ताने महिला सहकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. रक्तदान झाल्यावर महिला सहकाऱ्यांकडे रक्तदान प्रमाणपत्र सुपूर्त केले गेले. जैन फूडपार्क येथे डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी यांच्याहस्ते उद्घाटन झाले. जैन प्लास्टिकपार्क, टाकरखेडा टिश्युकल्चर पार्क आणि जैन फूडमॉल येथील सहकाऱ्यांनी रक्तदान केले. जैन फूडपार्क येथे जैन फूड पार्क, जैन ॲग्रीपार्क, जैन एनर्जीपार्क आणि जैन डिव्हाईन पार्क येथील सहकाऱ्यांनी उत्स्फूर्त रक्तदान केले.



## ओमकार अंध अपंग संस्थेतील अंध अपंगांना अन्न धान्याची मदत

वसई : नैसर्गिक पर्यावरण मानवता विकास संस्था यांच्यातर्फे ओमकार अंध अपंग संस्थेतील गरीब गरजु अपंगांना धान्य वाटप करण्यात आले. एका कार्यक्रमात हा मदतीचा उपक्रम पार पडला. यावेळी मुंबई जिल्हा उपाध्यक्षा सौ.वंदना पाटील, सौ.मिताली साळुंखे,सौ.सुवर्णा दळवी, सौ. पल्लवी पवार, सौ.शुभांगी शेलार, सौ.भाग्यश्री परब, बापू परब यांनी या कामी जबाबदारी पार पाडली. युवा सचिव बबलु चव्हाण, चंद्रकांत नागरे, सोनल पाटील, शरयु सावंत आदी यावेळी उपस्थित होते.

पान १ वरून....

## माता अशी कशी बरे वैरिणी ...

चिल्लाळ कुटुंबीय आपल्या दोन अपत्यांसह सरवदेनगरात राहण्यास होते. संतोष याचा हॉटेलचा व्यवसाय आहे ते रविवारी सकाळी उठून हॉटेलला गेले होते. त्यानंतर घराला आतून कडी लावून पत्नी स्नेहा हिने आपली मुलगी संध्या व मुलगा मनोजकुमार यांचा गळफास देऊन त्यांचा खून केला आणि त्यानंतर स्वतः ही तिने गळफास घेऊन आपले जीवन संपविले. दरम्यान हॉटेलला गेलेला पती संतोष यांनी घरी पत्नीला फोन लावला, परंतु कोणीही फोन उचलला नाही. त्यामुळे पती संतोष हे घरी आला, परंतु आतून कडी लावली होती. त्यामुळे त्यांनी खिडकीतून पाहिल्यानंतर तिघांचे मृतदेह लटकलेले दिसले. त्यानंतर त्यांनी आरडाओरडा केल्यानंतर गल्लीतील नागरिक जमा झाले. एमआयडीसी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन तिघांचे मृतदेह शासकीय रुग्णालयात पाठविले घटनास्थळाला सोलापूर शहर पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक तोरडमल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले आणि अधिकाऱ्यांनी भेट दिली. परंतु कोणत्या कारणामुळे स्नेहा हिने हे टोकाचे पाऊल उचलले हे समजू शकले नाही. हृदय हेलावून टाकणारा या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केला जात आहे. दर रविवारी पती संतोष हे आपल्या कुटुंबासाठी मटन घरी घेऊन यायचे नेहमीप्रमाणे त्यांनी आजही दुकानातून मटन व मासे घेतले आणि आपण घरी येत असल्याचे सांगण्यासाठी त्यांनी फोन केला. परंतु फोन घरातून कोणीही उचलला गेला नाही, म्हणून ते तातडीने घरी पोहोचले, तर घरात या तिघांचे मृतदेह लटकत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी हंबरडा फोडला.

## तीन हजारावरून दोघांमध्ये वाद...

हा गेल्या काही दिवसांपासून बेपत्ता झाला होता. गौरवचे नातेवाईक तसेच जवळच्या मित्रांनी त्याचा परिसरामध्ये फिरून खूप शोधघेतला, पण तो सापडला नाही. त्यानंतर मात्र गौरवच्या वडीलांनी म्हणजे पंडीत पुंजाजी शिरसाठ यांनी राहाता पोलीस स्टेशन गाठले. तिथे त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास वाघ, उपनिरीक्षक कमलाकर चौधरी यांची भेट घेतली आणि त्यांना आपला मुलगा गौरव शिरसाठ हा दि. १० नोव्हेंबर २०२३ पासूनबेपत्ता असल्याची माहिती दिली. सहाय्यक पोलीस निरीक्षक वाघ यांनी गौरव शिरसाठ याची सविस्तर माहिती, वर्णन आणि फोटोघेवून ठाणे अंमलदारांना मिसिंगदाखल करण्यास सांगितले. त्याचवेळी सहाय्यक पोलीसनिरीक्षक वाघ यांनी उपनिरीक्षककमलाकर चौधरी यांच्यासह हवालदार कल्याण काळे, व्ही. पी. पंडोरे, सुधाकर काळोखे, प्रभाकर शिरसाठ, अशोक झिने, कॉन्स्टेबल सुनिल मालनकर यांना गौरवचा सखोल तपास करण्याच्यासुचना दिल्या. पंडीत शिरसाठ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राहाता पोलीस स्टेशनला गौरव पंडीत शिरसाठ (वय ३०) हा बेपत्ता झाल्याची ५९/२०२३ मिसिंग दाखल करण्यात आली. समर्थनगरमधील गौरव हा तरूण अचानक बेपत्ता कसा झाला? याचा पोलीस शोध घेवू लागले. पोलीस पथकाचा तपास सुरू असतांनाच गौरव शिरसाठ याच्या नातेवाईकांनीही समांतर शोध घ्यायला सुरूवात केली होती. त्यावेळी त्यांना कळले की गौरव शिरसाठ याचा एक मित्रकिरण मोरे हाही दि. १४ नोव्हेंबर२०२३ पासून गायब झाला आहे. त्याच्या मोबाईलवर फोन लावला असता तोही बंद लागत होता. पोलिसांच्या मनात आता शंकेची पाल चुकचुकली होती. अगोदर गौरव आणि त्याचा मित्र किरणही गायब झाला होता. त्याचं असं नेमकं काय झालं कीदोघेही मित्र एका पाठोपाठ एक गायब झाले होते? सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी थोडीशीही उसंत न घेता गौरवचा शोध सुरू केला होता. दरम्यान गौरव याच्यानंतर गायब झालेला किरण मोरे याचा फोन बंद लागत होता. तो स्वत ड्रायव्हर असल्याने आऊट ऑफ स्टेट गेल्याची माहिती पोलिसांना कळली होती. पोलिसांनी किरण मोरेच्या मोबाईलचा सीडीआर तपासायला सुरूवात केली. बरेच दिवस त्याचा मोबाईल बंद होता. दि. २७ डिसेंबर २०२३ रोजी तो महाराष्ट्रात आल्याचे त्याच्या मोबाईलवरून ट्रेस झाले होते. दि. २८ डिसेंबर २०२३ रोजी किरण मोरे याच्या पाळतीवर असलेल्या पोलीस पथकाने त्याला सकाळीच ताब्यात घेतले. त्याला पोलीस स्टेशनला आणून चौदावे रत्न दाखवून चौकशी केली असता एक धक्कादायक माहिती समोर आली. शनिवार दि. ११ नोव्हेंबर २०२३ रोजी गौरव शिरसाठनेराखाडी रंगाची पँट अन् पिवळ्या रंगाचा फुलबाह्यांचा टी-शर्ट परिधान केला होता. गौरव शिरसाठ व किरण मोरे हे दोघेही ड्रायव्हर लाईनची माणसं होती. अधून-मधून दारू पिवून मौजमजा करण्याच्या त्यांना षोक होता. त्या दिवशीही ते दोघे जण एकत्र आले. गौरव याच्या मोटरसायकलचे सेल्फ स्टार्ट स्वीच किरण याच्याकडून खराब झाले होते, त्यामुळे 'माझ्या गाडीचे स्वीच तूच खराब केले आहे. त्याचे ३००० रूपये भरून दे' अशी मागणी गौरव किरणकडे करत होता, तेंव्हा गौरव व किरण या दोघांनी ती मोटरसायकल भन्साळी शोरूमला लावली होती. किरण स्वीच दुरुस्तीचे पैसे द्यायला तयारच नव्हता. याउलट त्याने ही कटकट आता कायमचीच दूर करण्यासाठी गौरवला संपवण्याचा प्लॅन केला. त्याचदिवशी किरण मोरे गौरवलादारू पिण्यासाठी म्हणून इरिगेशनबंगल्याकडे घेवून गेला. तेथे ते दोघे जण दारू पित बसले. किरण दारू पिण्याचे नाटक करत होता. संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास किरणने गौरवला लाकडी दांडक्याने जबर मारहाण केली. गौरव खाली पडताच त्याला तसेच फरफटत ऊसाच्या शेतात नेवून त्याचा गळा आवळून खून केला. खून करतांना आपल्याला कोणीही पाहिले नाही, कोणाला कळणारही नाही असे समजून तो राहाता शहरातून पळून गेला. तो तेलंगणा राज्यातील खामम येथे ड्रायव्हर म्हणून नोकरीला लागला. तो डिसेंबरच्या शेवटच्या आठवडयात विंचूरजवळीलशिवसाई कंपनीत ड्रायव्हर म्हणूनकामाला लागला होता. ज्यावेळी गौरव शिरसाठ व किरण मोरे यांचे मोटरसायकलच्या स्वीचवरून दि. ११ नोव्हेंबर २०२३ रोजी भांडण झाले होते, त्यावेळी त्या दोघांचा मित्र असलेल्या साईनाथ आहेर ते भांडण सोडवून त्यांना शांत केले होते, मात्र मनामध्ये खुन्नस धरून किरणने गौरवचा काटा काढला होता. तो गाडीवर ड्रायव्हर म्हणून कामाला लागल्यावर मात्र पोलिसांनी त्याला ताब्यात घेवून पोलीस स्टेशनला आणले होते. गौरव शिरसाठ याची भाची रविना तुषार राऊत हिने दिलेल्या फिर्यादीवरून राहाता पोलिसांनी किरण मोरेविरुद्ध भा.दं.वि. ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. इरिगेशन बंगल्याजवळील ऊसाच्या शेतात टाकलेला गौरव शिरसाठ याचा मृतदेह अनेक दिवस झाल्याने कुजला होता. त्याच्यावर राहाता ग्रामीण रूग्णालयाच्या डॉक्टरांनी जागेवर पी.एम. करून तसा रिपोर्ट दिला. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास वाघ करत आहेत.

## मित्राच्या पत्नीवर वाईट नजर ठेऊन ...

(गुन्हे), पोलीस निरीक्षक दत्तात्रय पाटील, सपोनि राहुल वाघमारे, पोउनि. संदिप पवार, विजयसिंह देशमुख, आत्माराम राठोड, शिवाजी काकडे, मपोउनि पौर्णिमा हांडे, मपोउनि पल्लवी शिसोदे इत्यादी घटनास्थळी दाखल झाले.तसेच परिमंडळ ६ चे पोलीस उप आयुक्त हेमराजसिंह राजपूत यांना ही माहिती प्राप्त होताच ते देखील तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी अंदाजे ३०-३५ वर्ष वयोगटातील एक इसम पडलेला होता. पोलिसांनी मृतदेहाची पाहणी केली असता,त्यांच्या अंगावर धारदार शस्त्राने वार केल्याचे दिसत होते.पोलिसांनी तातडीने सदर व्यक्तीला आपल्या गाडीत टाकून सायन रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. सदर व्यक्तीची कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून धारदार शस्त्राने वार करुन त्याचा खुन केला, म्हणुन अज्ञात आरोपी विरोधात टिळकनगर पोलीस ठाण्यात भा.द.वि.कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. या खुनाचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी परिमंडळ ६ चे पोलीस उप आयुक्त हेमराजसिंह राजपूत यांनी सहा पथके तयार केलीत. तपास पथकाने घटनास्थळवरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये पाहिल्यावर मयत व्यक्ती एका दुसऱ्या व्यक्ती यांच्यासोबत दारूचे सेवन करत असल्याचे आढळून आले. तसेच ते अधिक दारू खरेदी करण्यासाठी वाईन शॉपमध्ये जाताना दिसून आले .काही क्षणांनंतर, दुसरा व्यक्ती घटनास्थळावरून पळून जाताना दिसून आल्याने पोलिसनाचा त्याच्यावर संशय बळावला. स्थानिक गुप्तचर आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी गुरुवारी ७ मार्च रोजी संध्याकाळी या गुन्ह्यातील संशयित आरोपी रोहीत दिपक खरपे (वय २९) याचा माग काढून त्यास अटक करण्यात आली. पोलीस ठाण्यात आणून दीपकची कसून चौकशी केली असता गुन्ह्याची हकीगत पुढे आली. भिमसेन देवचंद भालेराव (वय ३५) आणि रोहीत दिपक खरपे (वय २९) हे दोघे ही टिळकनगर भागात राहत होते. ते दोघे एकमेकांना ओळखत होते कारण ते दोघे टिळक नगर भागात जन्मलेले आणि वाढलेले आहेत.सध्या भीमसेन भालेराव हे नवी मुंबई येथे राहतात.ते आरोग्य क्षेत्रात नोकरी करतात. काही दिवसांपूर्वी चेंबूर परिसरात राहत असलेल्या रोहित खरपे आणि भीमसेन याचा वाद झाला होता. भीमसेन हा आपल्या पत्नीला छेडत असल्याचा रोहितला संशय होता. ज्या दिवशी या दोघात वाद झाला, त्यादिवसापासून भीमसेन रोहितच्या डोक्यात बसला होता. दिनांक ८ मार्च २०२४ रोजी भीमसेन भालेराव हे नवी मुंबई वरून चेंबूर परिसरात रोहित खारपेच्या भेटीला आले. ते दोघेही तसे मित्र असल्याने मित्रवताच्या नात्याने दोघांनी दारू मागवली. रात्रीच्या वेळी चेंबूरच्या टिळकनगर भागात रोहित खारपे आणि भीमसेन भालेराव हे दोघेही दारू पीत बसले. यावेळी भीमसेन भालेराव यांनी रोहितच्या पत्नीबद्दल बोलण्यास सुरुवात केली आणि तिच्या चारित्र्याबद्दल विधाने केली. आपल्या पत्नीबद्दल वाईट, अपशब्द बोलल्याने रोहितला भीमसेनचा राग आला. यामुळे संतापलेल्या खारपे आणि भालेराव या दोघांमध्ये पहाटेच्या वेळी हाणामारी झाली. मारामारीदरम्यान खारपे याने भालेराव यांच्यावर धारदार शस्त्राने शरीरावर अनेक वार करून घटनास्थळावरून पळ काढला. गंभीर जखमी झालेल्या भीमसेन भालेराव हा रक्ताच्या थारोळ्यात जीवनमरणाचा शेवटी घटका मोजत असताना स्थानिक लोकांनी पोलिसांना फोन करून या घटनेची माहिती दिली. स्थानिक लोकांनी आणि पोलिसांनी भीमसेन भालेराव याला तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच तो मरण पावला. टिळकनगर पोलिसांनी या प्रकरणी रोहीत दीपक खरपे याच्या विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्यास चार तासात अटक केली. सदरची उल्लेखनीय कामगिरी अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग विनायक देशमुख, पोलीस उप आयुक्त हेमराजसिंह राजपूत, टिळकनगर पोलीस ठाणेचे वपोनि. दिपक बागुल यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विक्रम बनसोडे (गुन्हे), पोलीस निरीक्षक दत्तात्रय पाटील, सपोनि राहुल वाघमारे, पोउनि संदिप पवार, पोउनि विजयसिंह देशमुख, पोउनि आत्माराम राठोड, पोउनि शिवाजी काकडे, मपोउनि पौर्णिमा हांडे, मपोउनि पल्लवी शिसोदे, पोह सुनिल पाटील, पोह संजय शिंदे, पोह संदिप गर्ने, पोह सत्यवान साठेलकर, पोह सोमनाथ पोमणे, पोशि रोहीत फरांदे, पोशि समिर पिंजारी, पोशि गणेश गायकवाड, पोशि भारत नागरगोजे, पोशि दर्शन कोकाटे, पोशि मनोज कड़व, पोशि उमेश कटके यांनी यशस्वारित्या पार पाडली आहे.

## संपत्तीची हाव श्रीकांतच्या अंगाशी ...

ते विकण्याचा प्रयत्न करत होता. परंतु त्याला शशिकांत आणि त्याची पत्नी आरती विरोध करत होते. यामुळे ११ जून २०१८ रोजी श्रीकांत गुंडाळे याने वहिनी आरती कांबळे हीची चाकूने वार करून हत्या केली होती. जीव वाचविण्यासाठी आरती रक्ताच्या थारोळ्यात रस्त्यावर धावत आली होती आणि तेथेच कोसळली होती. या हत्ये प्रकरणात विरार पोलिसांनी श्रीकांतला अटक केली होती. त्याच्या विरोधात वसई सत्र न्यायालयत हत्या प्रकणाचा खटला सुरू होता. विरार पोलीस ठाण्याचे तत्कालीन वरीष्ठ पोलीस निरीक्षक घनश्याम आढाव यांच्या पथकाने सखोल तपास करून भक्कम पुरावे गोळा केले होते. न्यायालयात हे पुरावे सादर करण्यात आले. वसई सत्र न्यायालयाचे न्यायाधीश आर.डी. देशपांडे यांनी याप्रकरणी श्रीकांत कांबळे याला दोषी ठरवून जन्मठेप आणि २ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. श्रीकांत याने केलेली हत्या पूर्वनियोजित होती. यापूर्वी देखील त्याने भावाला आणि वहिनीला मारण्याची धमकी दिली होती. तशी तक्रार विरार पोलीस ठाण्यात होती. पालिकेतून त्याने खोटे दस्तावेज तयार करून घर नावावर केले होते. पोलिसांनी हे सर्व पुरावे गोळा केले. याशिवाय १० साक्षीदार तयार केले होते. त्यामुळे न्यायालयात सरकारी वकिलांची बाजू भक्कम झाली होती. आम्ही या प्रकरणाचा सखोल तपास करताना वस्तुनिष्ट पुराव्यांवर भर दिला होता. त्यामुळे आरोपी विरोधातील गुन्हा सिध्द होऊ शकला आणि मयत महिलेच्या कुटुंबियांना न्याय देऊ शकलो, असे आढाव यांनी सांगितले. ते सध्या कणकवली येथे सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणून कार्यरत आहेत. विरार पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार यांनी या मार्गदर्शन केले. पोलीस उपनिरीक्षक सी आर पाटील, हवालदार सुर्यवंशी, पोलीस नाईक संदीप पाटील, पोलीस उपनिरीक्षक कुंडगीर, लहुबंदे, शिवाजी बुरकूल यांनी तपास कामात महत्वाची भूमिका बजावली. सरकारी वकील म्हणून नजरीन मुल्ला यांनी काम पाहिले.

पान ८ वरून....

## आई-वडिलांची मान उंचावेल ...

पाटील देवणीकर, देवणी नगरीचे माजी सरपंच काशिनाथ मानकरी, माजी सरपंच अंकुश भाऊ गायकवाड बोंबळीकर, शेषराव मानकरी, शिवराजप्पा बिरादार, कांतराव अंबुलगे, वैजनाथ लुल्ले, जावेद तांबोळी, महादेव मळभगे, गोपाळ बिरादार, अतिश बनसोडे, ओमकार मसगल्ले, सुमित पाटील विजयनगरकर उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजक बबन कांबळे, शिवानंद कांबळे, सत्यजित कांबळे, विश्वजीत कांबळे, विवेक कांबळे, स्वप्नील कांबळे शुभम सोनवणे, ओमकार पांचाळ, संदीप सूर्यवंशी, केदासे अभिजीत, सचिन भातंबरे, भिम बोरे, ईश्वर बावस्कर, किरण गायकवाड, विकास सूर्यवंशी, नितीन गवारे, कृष्णा रोटे, संतोष वालेकर, गजेंद्र पांचाळ, सुरज पतंगे आदींनी परिश्रम घेतले.

## लातूर जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न ...

दरम्यान जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आमदार अमित देशमुख, आमदार अभिमन्यु पवार, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांना तर तीनदा प्रत्यक्ष भेटून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घ्यावा असे साकडे घातले होते. या दरम्यान मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून, पत्र, ईमेलद्वारे पाठपुरावा सुरूच ठेवला. शेवटी या विषयाचे गांभीर्य लक्षात आणून देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रत्यक्ष भेटण्याचा निर्णय माझं लातूर परिवाराने घेतला आणि त्या अनुषंगाने ६ मार्च २०२४ रोजी मुंबई येथील वर्षा शासकीय निवासस्थानी शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले. आम्ही ५ महिन्यांपासून अविरतपणे जिल्हा रुग्णालयासाठी शासन दरबारी पाठपुरावा करीत आहोत असे सांगितले. यावर मुख्यमंत्री शिंदे यांनी मी स्वतः लक्ष घालून हा विषय लवकरात लवकर कसा मार्गी लागेल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन शिष्टमंडळास दिले. याप्रसंगी खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांचीही यावेळी उपस्थिती होती. शिष्टमंडळात सतीश तांदळे, अभय मिरजकर, दिपरत्न निलंगेकर, विश्वजीत गायकवाड, डॉ सितम सोनवणे, डॉ जुगलकिशोर तोष्णीवाल, संजय स्वामी, काशिनाथ बळवंते, संजय जेवरीकर, उमेश कांबळे यांचा समावेश होता.

## रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ लातूर ...

करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अर्चना लड्डा, आनंदा कोचेटा, स्वर्णिमा कोचेटा, संगीता सोनकवडे, कौशल्या सोनकवडे, शकुंतला परदेशी, सोनाली पेन्सलवार, वनिता लाचुरीया, मैना कावळे, नीता इंगळे, कविता जोशी, स्मिता दगडे, अर्चना होळीकर, विजय व्हसाळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष रो. जांबुवंतराव सोनकवडे आणि सचिव रो.महेंद्र जोशी, निर्मला सोमाणी आणि रो. सुधीर ईटकर यांनी मार्गदर्शन केले.

## चित्रकलेला भाषेचे बंधन नाही ...

व खजिनदार शिखर हितेंद्र ठाकूर उदघाटनप्रसंगी उपस्थित होते व त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक अडचणी असल्यास आम्ही सर्वोतोपरी मदत करू असे विद्यार्थ्यांना आश्वासन दिले . प्राचार्य डॉ. संगीता पाटील यांनी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या विवा इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट या कला महाविद्यालयाला यावर्षी तेरा वर्षे पूर्ण झाली आहेत तसेच महाविद्यालयास भारत सरकारच्या ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन या विभागाची मान्यता प्राप्त असून मुंबई विद्यापीठाची संलग्नता आहे. अशी माहिती देऊन महाविद्यालयाच्या वर्षभराच्या अभ्यासाबाबत तसेच विविध कार्यक्रमाचा आढावा घेत पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी उपयोजित कला पदवी आणि पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना विविध कलेतील पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या वेळी व्यासपीठावर अबोली जगताप, पराग शहाणे आणि संस्थेच्या सल्लागार समितीचे सदस्य अनिल ठाकूर, राजेंद्र वनमाळी उपस्थित होते. प्रा.अक्षता मेस्त्री व प्रा. नकुल सुतार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व विद्यार्थी प्रतिनिधी, अभिषेक गोंजारी, यांनी पाहुण्यांचे आभार मानून चित्रकला प्रदर्शन २७ फेब्रुवारी ते ३ मार्च पर्यंत, सकाळी ९ ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत सगळ्यांसाठी खुले असेल असे जाहीर केले.

## विचार, दिशा आणि दृष्टी ...

अहमदपूर सहभागी होते. वाचन संवाद या उपक्रमातून साहित्याच्या सहवासात मी वावरतो आहे. एका महिन्यात दोन वेळा पुस्तकावर चर्चा घडवून आणतो. या उपक्रमामुळे माझी नवी ओळख महाराष्ट्रात झाली. ही ओळख मला साहित्याने दिली आहे असे अनंत कदम यांनी सांगितले. एका सामान्य मुस्लिम कुटुंबात जन्माला आलो. स्वकष्टाने अनंत अडचणीतून शिक्षणाचा प्रवास सुरू ठेवला. गरिबी, दारिद्र्यात वाढलो पण पुस्तकामुळे माणूस झालो. शिकत असतांना आपण लेखक व्हावे, आपलाही धडा पाठ्यपुस्तकात असला पाहिजे. या जाणिवेतून मी जीद्दीने जीवन प्रवास केला. साहित्याचे वाचन व लेखनातून माझी ओळख झाली असे कादरी म्हणाले. अध्यक्षीय समारोप डॉ जयद्रथ जाधव म्हणाले की, साहित्याच्या सहवासात मी बारावी नंतर आलो.

श्यामची आई हे पहिले पुस्तक मी वाचले. या पुस्तकाचा मोठा प्रभाव माझ्यावर पडला. मंनोरंजन साहित्यापेक्षा प्रबोधन, वास्तव साहित्याच्या वाचनात आणि समीक्षेत मी रमतो. संत साहित्याकडून मी मानवतेचा विचार घेतला. साहित्यामुळेच जीवनाची दृष्टी व दृष्टीकोन मिळाला व मूल्यांची ओळख झाली. या कार्यक्रमाला जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के साहेब, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, प्रचार्य डॉ. सोमनाथ रोडे, पांडुरंग अडसुळे, विवेक सौताडेकर, राम मेकले, प्रभाकर कापसे, योगीराज माने, धनंजय गुडसुरकर, अंबादास केदार, शैलजा कारंडे, नयन राजमाने, सुनिता मोरे, सुलक्षणा सरवदे, वृषाली पाटील, तहसीन सय्यद, बालाजी सूर्यवंशी, हावगीराव बेरकिळे, हरिश्चंद्र डेंगळे, हिरालाल पाटील, सुरेश जाधव, गुलाब चव्हाण, आत्माराम कांबळे, गुप्तलिंग स्वामी, विठ्ठल कटके, सूर्यकांत शिरसे, श्रीधर स्वामी, युवराज जाधव, धनंजय पवार, सौ.गोकर्ण सूर्यवंशी, तुकाराम सुगावकर, अशोक खोडवे आणि लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे ग्रंथपाल उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाटील यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार श्री प्रभाकर कापसे यांनी मानले.

## लातूरच्या लिंगायत समाजाच्या...

असल्याशिवाय कोणीही मोठा होऊ शकत नाही, असे सांगितले. उदय चौंडे यांनी अत्यंत मोठ्या मनाने राष्ट्रवादी भवनसाठी जागा उपलब्ध करून दिल्यामुळेच कार्यालयाचे उदघाटन होऊ शकले असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमाकांत कोरे यांनी तर आभार प्रदर्शन उदय चौंडे यांनी केले. या सोहळ्यात वीरशैव लिंगायत समाज, कपिलधार सेवा संघ, लिंगायत सेवा संघ यांसह विविध संघटनांच्या वतीने आ. जयंत पाटील यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी राजाभाऊ हालकुडे, शिवलिंगप्पा जवळे, बंडाप्पा जवळे, राजकुमार कत्ते, डॉ.अरविंद भातांब्रे, बालाजी पिंपळे, अक्षयकुमार चौंडे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## भिवंडी तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांना ...

चिराडपाडा, दाभाड, अनगाव, कुंदे, आंबराई, मोहंडूळ, कोळीवली, वाघिवली विश्वभारती फाटा ह्या गावातील २०० जेष्ठ नागरिकांना मोफत अन्नधान्य किट चे वितरण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भिवंडी लोकसभा संपर्कप्रमुख माजी आमदार रुपेश म्हात्रे, जिल्हा प्रमुख विश्वास थळे, सहसंपर्क प्रमुख सोन्या पाटील, उपजिल्हा प्रमुख इरफान भुरे, प्रकाश भोईर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी महिला उप जिल्हा संघटिका कविता भगत, युवासेना जिल्हा सचिव राजाभाऊ चौधरी, उपतालुका प्रमुख अनंता पाटील अनंता शेलार, नितीन जोशी, तालुका सचिव दीपक पाटील, राजेंद्र काबाडी, सुरज मानकर व कवाड धामणगाव जिल्हा परिषद गटातील पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.

# देवणी तालुक्यात भगरीतून ४४३ जणांना विषबाधा

## वाघनाळवाडी व खरबवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहातील घटना



**देवणी/प्रतिनिधी**

अखंड हरिनाम सप्ताहाच्या कार्यक्रमात महाप्रसादासाठी करण्यात आलेले भगर खाल्ल्याने देवणी तालुक्यातील वाघनाळवाडी व खरबवाडी येथील ४४३ जणांना विषबाधा झाल्याची घटना गुरुवार दि.७ मार्च रोजी संध्याकाळी सहा वाजेच्या दरम्यान घडली असून सर्वच रूग्णांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ.स्वाती सोनवणे यांनी दिली आहे. खरबवाडी व वाघनाळवाडी या दोन्ही गावात अखंड हरिनाम सप्ताह चालू असून एकादशी असल्याने उपवासासाठी प्रसादात भगर करण्यात आले होते. संध्याकाळी सहा वाजेच्या दरम्यान नागरिकांनी भगरीचे सेवन केले होते. डॉ.सुमन काळे, डॉ.ज्ञानेश्वर गायकवाड (वलांडी) यांच्या पथकाने वाघनाळवाडी ता.देवणी गावात रात्री ११.०० वाजता दाखल होत ३०६ रूग्णांवर गावातील मंदीरावर उपचार केले. तर ६ रूग्णांना ग्रामीण रूग्णालय देवणी तर ३ रूग्णांना वलांडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. जणांवर ग्रामीण रूग्णालय देवणी व ७ रूग्णांना उपजिल्हा रुग्णालय उदगीर येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. दोन्ही गावांतील रूग्णावर आरोग्य विभागाच्या पथकाकडून लक्ष ठेवण्यात येत असून वेळेत उपचार मिळाल्याने सर्वच रूग्णांची प्रकृती सामान्य असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. दरम्यान वाघनाळवाडी व खरबवाडी येथील दोन्ही घटना सारख्याच असून दोन्ही ठिकाणी प्रसादासाठी वापरण्यात आलेला भगरही एकाच कंपनीचा असून प्रथमदर्शनी तरी भगरीतूनच विषबाधा झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नमुना तपासणीसाठी लातूरला पाठवण्यात आले असून अहवाल आल्यानंतरच बोलणे उचित ठरेल. ४४३ पैकी एकाही रूग्णांची प्रकृती गंभीर किंवा अति गंभीर नसून सर्व रूग्णांची प्रकृती सामान्य असून काळजीचे काहीही कारण नाही. शिवाय आरोग्य विभाग त्यांच्या वर लक्ष ठेवून आहे, असे देवणी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.स्वाती सोनवणे यांनी सांगितले.

# वाड्यातील गटारीवरील अतिक्रमण हटवले



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा शहरातील खंडेश्वरीनाका ते परळीनाका दरम्यान रस्त्याच्या दुतर्फा अनधिकृत फेरीवाल्यानी दुकाने मांडली होती, तर काही फेरीवाले चक्क गटारीवर बसत असल्याने पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागत होते. त्यामुळेच १ मार्च रोजी एका वयोवृद्धाचे रस्त्यावरून चालत असताना अपघाती निधन झाले होते. तर भूमिपुत्र संघटनेच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार करून कारवाईची मागणी केली होती, तरी अनधिकृत फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडीची समस्या बिकट झाली होती. फूटपाथ मोकळा करण्याच्या उद्देशाने वाडा नगर पंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग व वाडा पोलीस यांनी संयुक्त रित्या कारवाई करून रस्त्याच्या दुतर्फा असलेले भाजी विक्रेते, मच्छी विक्रेते व इतरांना तेथून हटवले व ज्या दुकानदारांनी दुकानासमोरील गटारीवर शेड बांधले होते ते पण काढून घेऊन रस्ता मोकळा केला आहे. वाडा नगरपंचायतीचे मुख्यधिकरी मनोज पष्टे, सार्वजनिक बांधकाम विभाचे उप अभियंता संजय डोंगरे व पोलीस उप निरीक्षक चंद्रकांत हाके यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन कारवाई केल्याने नागरिकांकडून त्यांचे स्वागत होत आहे. तर हे फेरीवाले पुन्हा गटारीवर बसू नये याचीही दक्षता घेण्याची मागणी होत आहे.

# प्रमुख मागण्यांसाठी कामगारांचे आमरण उपोषण




**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील खूपरी येथील सुधीर स्विच गीअर्स या कंपनीच्या मनमानी व अन्यायकारक भूमिकेविरोधात जिजाऊ कामागर संघटनेचे वाडा तालुका अध्यक्ष सुरेश भोईर व कामगारांनी तहसील कार्यालयास पत्र व्यवहार केला होता. त्या पत्रात कामगारांच्या मगाण्यांचा उल्लेख केला होता, तरीही कंपनी व्यवस्थापना कडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याने बुधवारी (दि.६ मार्च) कामगारांनी तहसील कार्यालया समोर आमरण उपोषण सुरु केले आहे. एक फेब्रुवारी पासून बेकादेशीररित्या कामगारांना गेटच्या आत मध्ये येण्यास बंदी केली आहे ती बंदी उठून कामगारांना कामावर रुजू करण्यात यावे, कामगारांना मागील दोन महिन्यांचा पगार त्वरित द्यावा, व्यवस्थापनाच्या संगणमताने महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेच्या पदाधिकाऱ्यांकडून कामगारांवर चालू असलेली दादागिरी, दमदाटी बद्दल संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी, कामगारांवरील दडपशाही बंद करून सहकार्याची भूमिका घ्यावी, कंपनीकडून बेकायदेशीररित्या कमी केलेल्या कामगारांना कामावर रुजू करून घ्यावे. अशा मागण्या घेऊन कंपनीतील कामगार दीपक वड, अमित पाटील, प्रतीक वाकचौरे, ऋषी शर्मा, अल्पेश हरड, धरमचंद चव्हाण, लल्लन चव्हाण हे आमरण उपोषणाला बसले आहेत.

# वसई-विरार किकबॉक्सर्सचा जागतिक स्तरावर डंका; भारतासह १४ देशांचा आणि ११०० खेळाडूंचा सहभाग



**वसई/प्रतिनिधी**

वसई-विरार मधील किकबॉक्सिंग खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय मंचावर आपले पराक्रम दाखवून, तिसऱ्या इंडीयन ओपन आंतरराष्ट्रीय किकबॉक्सिंग चॅम्पियन्सशिप २०२४, केडी जाधव इन्डोअर हॉल, दिल्ली मध्ये प्रभावी नऊ पदके जिंकली. सुर्यप्रकाश मुडांपाट यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली भारताचे प्रतिनिधित्व करताना ३ सुवर्ण, ४ रौप्य व २ कांस्य पदके पटकावत संघाने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या प्रतिष्ठित मनाल्या जाणाऱ्या चॅम्पियन्सशिपमध्ये इराक, तुर्की, सिंगापूर, नेपाल, ग्रेट ब्रिटन, कझाकीस्तान, उझबेकीस्तान आणि अर्थातच भारतासह १४ देशांचा समावेश होता. प्रेसिडेंट ऑफ वाको हरॉय बेकर हे पहिल्यांदाच ह्या टुर्नामेंटसाठी भारतात आले होते. तसेच टेक्निकल कमिटीचे हेड रोमिओ डेसा व रेफ्री कमिटीचे चेअरमन ब्रायन बेक हे देखिल या टुर्नामेंटसाठी उपस्थित होते. किकबॉक्सिंग संघाचे वाको इंडियाचे अध्यक्ष संतोष कुमार अग्रवाल आणि वाको महाराष्ट्राचे अध्यक्ष नीलेश शेलार यांच्याकडून त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अभिनंदन केले. या स्पर्धेत ११०० पेक्षा जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवला. त्यात पालघर जिल्ह्यातील वसई विरार भागातील एकूण ६ मुलांनी सहभाग घेतला होता. विजयी खेळाडूंची नावे पुढील प्रमाणे, डल परेरा- १ सुवर्ण, १ रौप्य व १कास्य, प्रणय अग्रवाल- १ सुवर्ण व १ रौप्य, तौरीन बार- १ सुवर्ण, स्कॅरलेट डायस- १ रौप्य व १ कास्य, ग्वेनित बॅप्टीस्टा- १ रौप्य पदक मिळवून चांगली कामगिरी केली. तर सायकत करमरकर याने सुद्धा खेळत उत्तम प्रदर्शन केले. स्पर्धकातील बहुतेक मुलांना प्रशिक्षक सूर्यप्रकाश मुडांपाट, सागर भोईर यांच्या मार्गदर्शनात प्रशिक्षण मिळाले आहे. या स्पर्धेसाठी सुर्यप्रकाश मुडांपाट, अक्षय वेरनेकर, निनोष्का डायस हे पंच म्हणून उपस्थित होते. त्यांनी या स्पर्धकांच्या मागे अतोनात मेहनत घेतली. यावेळी महाराष्ट्र किकबॉक्सिंग स्पोर्टस असोसिएशनचे अध्यक्ष निलेश शेलार यांचे आभार मानले. त्यांनी ह्या मुलांना पुन्हा एकदा जोमाने पुढे जाण्याची संधी दिली. तसेच या खेळासाठी वेळोवळी मदतीस धावून येणारे वसई विरारचे चिफ पेट्रन आफीफ शेख तसेच कलाक्रीडा कमिटीचे सेक्रेटरी प्रकाश वनमाळी यांनी देखील आनंद व्यक्त केला. वसई विरार महापालिकेकडून तसेच वसईचे आमदार हितेंद्र ठाकुर यांनी देखिल या खेळाडूंसाठी वेळोवेळी मदतीचा हात दिला आहे. त्यांच्यामुळेच ह्या मुलांना कला-क्रीडा सारखा प्लॅटफॉर्म लाभला आहे. ज्यामुळे ह्या मुलांना पुढे जाण्यास प्रेरणा मिळते. अशा ह्या खेळाडूंवर पालघर तालुक्यात कौतुकाचा वर्षाव सुरू आहे.

# जादूटोण्याच्या संशयावरून वृध्दाला आगीवरून चालवले; ९ जणांविरुद्ध गुन्हा



**मुरबाड/प्रतिनिधी**

जादूटोण्याच्या संशयावरून मुरबाड तालुक्यातील केरवेळे गावातील एका ७५ वर्षांच्या व्यक्तीला आगीतून चालायला लावल्याचा धक्कादायक आणि अमानुष प्रकार समोर आला आहे. लक्ष्मण भावार्थे असे या वृद्ध व्यक्तीचे नाव असून ते या प्रकारात जखमी झाले आहेत. त्यांच्या मुलीने दिलेल्या तक्रारीवरून गावातील नऊ व्यक्तींविरुद्ध मुरबाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमवारी, ४ मार्च रोजी रात्री मुरबाडच्या केरवेळे गावात जागरण गोंधळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानिमित्ताने जागरण सुरू असताना त्यातील काही व्यक्ती थेट लक्ष्मण भावार्थे यांच्या घरात शिरले. त्यांनी लक्ष्मण भावार्थे यांना ओढून कार्यक्रमाच्या ठिकाणी आणले. जादूटोणा आणि करणी करण्याच्या संशयावरून त्यांना जबरदस्तीने आगीवर नाचायला लावले. याबाबतची एक चित्रफीत प्रसारित होत असून त्यात काही तरुण भावार्थे यांना ओढून निखाऱ्यावर चालवत आहेत. पुढे. त्यांना त्या निखाऱ्यावर पाडण्यातही आल्याचे दिसते आहे. यावेळी भावार्थे जखमी झाले आहेत. त्यांच्या पायाला फोड आले असून पाठीवरही भाजले आहे. या प्रकारानंतर सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे. यातील नऊ जणांविरुद्ध मुरबाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अर्नाळा वसई येथे पशुपालकांचे दोन दिवसीय माहिती, प्रशिक्षण आणि जनसंपर्क शिबीर संपन्न




**विरार/प्रतिनिधी**

अर्नाळा येथे पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती वसई यांच्या मार्फत वसई तालुक्यातील पशुपालक व शेतकरी यांच्यासाठी माहिती, जनसंपर्क शिबीर आयोजित करण्यात आले होते. वसई तालुक्यातील एकूण १९० पशुपालकांनी ह्या दोन दिवसीय प्रशिक्षणाचा लाभ घेतला. या शिबिरात दुग्धपालन, कुक्कुटपालन व शेळीपालन या विषयी तज्ञा कडून मार्गदर्शन झालेच त्याच बरोबर सदर व्यवसाय करणारे पशुपालकांनी देखील या विषयी मार्गदर्शन केले. वसई तालुक्यातील पशुपालकांना विविध पक्षी जाती यामध्ये कडकनाथ, सोनाली, इजिप्त भागातील फयुम नावाची कोंबडी, कावेरी, सिल्की, बदकांचे विविध प्रकार मनिला, इंडियन रनर, टर्की, गिनी कोंबडी त्याचबरोबर प्रथमच अमेरिकन यॉर्क शायर जातीचे डुक्कर, जनावरांचा चारा बियाणे, याड्रॉफोनिक मका या सर्वांचे प्रत्यक्ष डेमो दाखवण्यात आले. त्यामुळे पशुपालकांचा व लोकप्रतिनिधींचा उत्साह द्विगुणित झाला. सदर कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी अशोक पाटील सभापती पंचायत समिती, सुनील अंकारे उप सभापती पंचायत समिती, डॉ. प्रशांत कांबळे प्रादेशिक सह आयुक्त मुंबई विभाग, संजय शिंदे सहायक आयुक्त, नंदकुमार घरत सरपंच अर्नाळा, संगीता भांगरे गट विकास अधिकारी वसई, प्रदीप डोलारे सहायक गट विकास अधिकारी, पृथ्वीराज पाटील, आदित्य राऊळ, रमेश वझे माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, किरण पाटील अध्यक्ष अर्नाळा शेतकरी सोसायटी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सदर प्रशिक्षणार्थी यांना पशुसंवर्धन व कृषी विभागाचे कॅलेंडर वाटप करण्यात आले तसेच बियाणे अर्ज व किसान क्रेडिट कार्ड करिताचे अर्ज वाटप करण्यात आले. पशुपालकांनी योजने मध्ये लाभ घेण्यासाठी सभापती यांनी आव्हान केले. स्मार्ट योजने मध्ये सहभागी होण्याबाबत प्रशांत कांबळे ह्यांनी आव्हान केले व योजनांची सविस्तर माहिती पशुपालकांना दिली. डॉ.नकुल कोरडे, डॉ सिद्धार्थ साबळे, डॉ.संभाजी प्रधान, डॉ. पारधी, डॉ. डोंगरदिवे, स्मिता गायकवाड सर्वांनी पशुपालकांना मार्गदर्शन केले. पशुसंवर्धन व कृषी विभाग कर्मचारी ह्या कार्यक्रमाकरिता दोन दिवस उपस्थित होते.अजित सोवारीस, भूपेश पाटील, सागर माळी, अलवीन रॉर्ड्रिक हया पशुपालकांनी यासाठी मेहनत घेतली.

# चुळणे येथील विश्व आशा फौंडेशनतर्फे पोलीस कुटुंबियांसाठी मोफत नेत्र, कान तपासणी शिबीर



**वसई/प्रतिनिधी**

चुळणे येथील विश्वआशा फौंडेशन ही संस्था आरोग्याबद्दल जनजागृतीचे कार्य करीत असून, विशेषतः डोळे, कान विषयक समस्या, तसेच मोतीबिंदू मार्गदर्शन आणि साहाय्य करीत असते. पोलीस हा समाजा मधील महत्वाचा घटक असून समाजाचे आरोग्य सांभाळण्याचे काम पोलीस करत असतात. पोलीस बांधवाना नोकरी मधील ताण तणावामुळे स्वतः च्या कुटुंबाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. ही बाब लक्षात घेवून विश्व आशा फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष लिनस डिकोन्हा यांनी सामाजिक दृष्टीकोण ठेऊन पोलीस आणि त्यांच्या कुटुंबामधील सदस्साठी नेत्र आणि कान तपासणी शिबीराचे आयोजन माणिकपूर पोलीस स्टेशनमध्ये केले होते. या शिबीरास कान तपासणीसाठी मृदुल श्रवण साहाय्य केंद्र आणि डोळे तपासणीसाठी बचू अली धर्मादाय नेत्र रुग्णालय यांचे सहकार्य लाभले. शिबीराला उत्तमं प्रतिसाद मिळाला. शिबीराचे उदघाटन परिमाडळ-२ च्या पोलीस उपायुक्त सौ पौर्णिमा चौगुले-श्रींगी यांच्याहस्ते झाले.यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने, पोलीस निरीक्षक संतोष चौधरी आणि पोलीस वृंद उपस्थित होते.

# वसई ते भाईंदर फेरी बोटीला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद!



**वसई/प्रतिनिधी**

वसई-भाईंदर दरम्यान महाराष्ट्र सागरी मंडळाने फेब्रुवारीपासून सुरु केलेल्या रो-रो फेरीबोट सेवेला ग्रामीण भागातील ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सध्याच्या प्रवासी बोटींसोबत आणखी एक प्रवासी नौकाही या मार्गावर आता धावणार आहे. त्यामुळे सुट्टी दिवशी व साप्ताहिक सुट्टीला देखील दर २० मिनिटाला ही नौका (फेरीबोट) सेवा देणार आहे. सुवर्णदुर्ग शिपिंग व मरिन सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या या नौका प्रवासी फेरी करीत आहेत. या कंपनीने ही वसई ते भाईंदर दरम्यान रो-रो सेवा २० फेब्रुवारीपासून सुरु केली आहे. ही सेवा सुरु केल्यापासून ५ मार्चपर्यंत वसई येथून ९९५६ तर भाईंदर येथून ८५७१ असे एकूण १८५२७ प्रवाशांना या सेवेचा लाभ घेतला आहे. शनिवार, रविवार या दिवशी गर्दीच्या वेळी सरासरी ४५ मिनिटांनी ही सेवा सुरु असून १४ दिवसांमध्ये १३५८ बारा वर्षांपेक्षा खालील मुलांसह एकूण ११२४६ प्रवाशांनी या फेरीबोटीमधून प्रवास केला. त्याचबरोबर १२२४ नागरीकांनी या बोटीतून एक तासाची पर्यटन सफर केल्याचे दिसून आले आहे. त्याचबरोबर २९१० दुचाकी, १७०७ चारचाकी वाहने व त्या बरोबरीने सायकली, रिकामी तीन आसनी रिक्षा यांची देखील या रो-रो सेवेतून वाहतूक झाली आहे. या फेरीबोट सेवेला मिळालेला प्रतिसाद पाहता तसेच फेरीबोटीच्या प्रतीक्षेत नागरीकांना त्रास सहन करावा लागत असल्याने सुवर्ण दुर्ग शिपिंग व मरिन सर्विसेसने या मार्गावर दुसरी फेरीबोट सुरु करण्याची अनुमती मागितली होती. ही अनुमती महाराष्ट्र सागरी महामंडळाने दिल्याने वसई-भाईंदर दरम्यान गर्दीच्या वेळेस दर २० मिनिटाला रो-रो सेवा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# भिवंडीत महाशिवरात्री उत्साहात साजरी



**भिवंडी** : महाशिवरात्री उत्सव संपूर्ण देशभर उत्साहात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून साजरा होत असताना भिवंडी शहर व ग्रामीण भागातील मंदिरात महाशिवरात्री निमित्त शिवभक्तांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली होती. शहरातील पुरातन भिमेश्वर मंदिर, रामेश्वर मंदिर, खडबडेश्वर मंदिर, पोगाव येथील दिंडेश्वर मंदिर यासोबत शहरातील कामतघर, तसेच भिवंडी तालुक्यातील लोनाड येथील प्राचीन पांडव कालीन शिवमंदिर, पूर्णा, राहनाळ, पडघा या ठिकाणी शिवमंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. तर या निमित्त अनेक मंदिरात हरिनाम सप्ताहाचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. तर अनेक ठिकाणी सेवाभावी संस्थांकडून फराळाचे वितरण करण्यात आले.

# राज्याचे प्रधान सचिव (रोहयो) दिनेश माघमारे यांची खानिवली ग्रामपंचायतला भेट



**वाडा/प्रतिनिधी**

रोजगार हमी योजनेचे राज्याचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे यांनी वाडा तालुक्यातील खानिवली ग्रामपंचायतला भेट दिली. दरम्यान गावातील रोजगार हमी योजनेच्या कामांची पाहणी केली. तसेच अमृत सरोवर व गांडूळ खत निर्मिति बाबत माहिती घेतली. खानिवली ग्रामपंचायत ही तालुक्यातील नंदादिप ग्राम म्हणून निवडण्यात आली आहे. ग्रामपंचायत मध्ये रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून वैयक्तिक शोषखयांचे काम चालू असून घरोघरी शोषखड्डे तयार करण्याचे काम सुरु आहे. तसेच वैयक्तिक सिंचन विहिर, गायगोठे, शेळी पालन शेड, नाडेप कंपोस्ट, पेव्हर ब्लॉक रस्ते, सिमेंट काँक्रीट रस्ते तयार केले आहेत तसेच तयार करण्याचे काम सुरु आहे. रोजगार हमी योजनेचा लाभ घेऊन गावातील महिलांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या सर्व कामांची पाहणी करण्यासाठी स्वतः राज्याचे रोजगार हमी योजनेचे सचिव दिनेश वाघमारे, विजयकुमार कलवले, सहाय्यक संचालक रोहयो यांनी भेट दिली. यावेळी गटविकास अधिकारी राजेंद्र खताळ, त्यांच्या सोबत प्रमोद पाटील, झज तसेच विजय भोईर, अभियंता योहयो, सरपंच भरत हजारे, सदस्य सारिका पाटील, निकिता वाघ ग्रामसेवक पंकज चौधरी उपस्थित होते.यावेळी ग्रामपंचातीच्या इलेक्ट्रिक घंटा गाडीचे उद्घाटन दिनेश वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले.

# आदिवासी भागात 'मनरेगा'च्या माध्यमातून नागरिकांची समृद्धीकडे वाटचाल -राज्यपाल





**पालघर/प्रतिनिधी**

आदिवासी भागात 'प्रत्येक हाताला काम' देण्याची आवश्यकता आहे. काम करताना सिंचनाची सोय म्हणजेच 'प्रत्येक शेताला पाणी' उपलब्ध करून दिले, तर मनरेगा मार्फत अधिक चांगले काम होऊ शकते. अनेक गावात मनरेगाअंतर्गत विविध कामे होत आहेत. मनरेगाच्या माध्यमातून नागरिकांची समृद्धीकडे वाटचाल सुरु असल्याचे प्रतिपादन माननिय राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

विक्रमगड तालुक्यातील विकसित गाव खोमारपाडा येथील विकासकामांची पाहणी राज्यपाल रमेश बैस यांनी केली त्यावेळी त्यांनी गावकरी यांच्याशी सवांद साधला त्यावेळी राज्यपाल रमेश बैस बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, खासदार राजेंद्र गावित, मनरेगाचे संचालक नंदकुमार, जिल्हाधिकारी गोविंद बोडके पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे तसेच वरिष्ठ अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

मिशन मनरेगाचे संचालक नंदकुमार यांनी मला सांगितले होते की मनरेगाच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंब समृद्ध होऊन करोडपती होऊ शकते. उसुरुवातीला माझा विश्वासच बसला नाही. पण खोलवर विचार केल्यावर असे लक्षात आले की एकदा सिंचनासाठी पाण्याची व्यवस्था केली की ते पाणी शास्त्रोक्त पद्धतीने वापरणे शक्य आहे अशा प्रकारे गावाचा विकास होईल. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित भारत बनवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सर्व गावे 'विकसित गावे' झाली तरच भारत 'विकसित भारत' होईल. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पंतप्रधानांनी 'विकास भारत' संकल्प यात्रा सुरू केली आहे, जी देशातील सर्व गावे व्यापत आहे. भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या विविध विकास योजना अपेक्षित लाभार्थ्यांपर्यंत का पोहोचत नाहीत हे प्रथमच समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जिल्हास्तरावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रेरित करण्यात विकास भारत संकल्प यात्रा यशस्वी होत असून विविध योजनांचा लाभ लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे राज्यपाल रमेश बैस यांनी सांगितले. गेल्या १० वर्षात भारत सरकारने शेतकरी सक्षमीकरणाला प्राधान्य दिले आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे, त्यांना तंत्रज्ञानानुकूल बनवणे, कृषी संशोधन आणि शिक्षणाला चालना देणे आणि शेतीशी संबंधित पायाभूत सुविधा निर्माण करणे इत्यादी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी उद्दिष्टे निश्चित करण्यात आली होती.

तंत्रज्ञानापासून पीक विम्यापर्यंत, आधुनिक सिंचन पद्धतींपर्यंत सहज कर्ज उपलब्ध करून देणे, सरकार शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी सर्वसमावेशक कृती योजना राबवत आहे. प्रत्येक कुटुंबाला करोडपती बनवण्याची कल्पना अशक्य वाटली. पण खोमारपाडा सारख्या अत्यंत दुर्गम, मागास आणि आदिवासी भागात हे शक्य झाले असेल तर ते कुठेही नक्कीच शक्य होऊ शकते माझ्या माहितीनुसार, देशातील हे पहिले गाव असेल जिथे मनरेगाचा वैयक्तिक लाभ घेऊन बहुतेक नागरिक समृद्धीकडे वाटचाल करत आहेत. त्यामुळे आता आदर्श उदाहरण म्हणून खोमारपाडा गाव पुढे येत असल्याचे राज्यपाल रमेश बैस यांनी सांगितले.

# आई-वडिलांची मान उंचावेल असे काम करा - प्रा. डॉ. वसंत हंकारे

**देवणी/प्रतिनिधी**



आयुष्यामध्ये असंख्य चुका करत आपण घडत असतो. आपण कष्टाला आव्हान देत मनातला निश्चय पूर्ण करत आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करत गगनात भरारी घेऊन सोनेरी आयुष्य घडवा आणि समाजात कुटुंबाची मान उंचावेल अशी कामगिरी करा, एक आदर्श भारतीय नागरिक व्हा. मनातील घुसमूट करणाऱ्या चुका एका कागदात लिहून त्या होम मध्ये जाळण्यात याव्यात असेही यावेळी ते म्हणाले, आयुष्यात सतत चुका होणार नाहीत याचे भान मनाशी ठेवा. आई-वडिलांच्या कष्टाचे सोने करण्यासाठी आयुष्याला घडविण्यासाठी आपण कष्ट करायला हवेत असे प्रतिपादन धडाकेबाज व्याख्याते डॉ.प्रा.वसंत हंकारे यांनी केले देवणी येथील साई प्रतिष्ठान आयोजित देवणी कला क्रीडा महोत्सवानिमित्त व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मलिकार्जुन मानकरी तर प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्षा डॉ.कीर्तीताई घोरपडे, माजी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष भगवानराव पाटील विजय नगरकर, माझी महिला बालकल्याण सभापती कुशवर्ता बेळे, देवणी पंचायत समितीचे माझी उपसभापती प्राचार्य यशवंत ...पान ६ वर

# लातूर जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न लवकरच मार्गी लावू; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन!

**मुंबई/प्रतिनिधी**



लातूर जिल्हा रुग्णालयाच्या प्रश्नाबाबत आपण स्वतः लक्ष घालणार असून हा महत्वपूर्ण विषय लवकर मार्गी लागेल असे आश्र्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझं लातूर परिवाराच्या शिष्टमंडळास दिले. मुंबई येथील वर्षा निवासस्थानी शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले त्यावेळी बोलताना शिंदे यांनी हे आश्वासन दिले. गत १२ वर्षांपासून मंजूर असूनही जागा हस्तांतरापोटी आरोग्य विभागाने कृषी विभागास फक्त ३ कोटी ३२ लाख रुपये मोबदला देणे आहे या जुजबी कारणासाठी हा विषय शासन दरबारी प्रलंबित आहे. या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी माझं लातूर परिवाराने २ ऑक्टोबर २०२३ पासून शहारातील गांधी चौक येथे बेमुदत साखळी उपोषणास प्रारंभ केला होता. या उपोषणास लातूरकरांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला होता. माजी आमदार वैजनाथ शिंदे, शिवाजीराव पाटील कव्हेकर, माजी खासदार डॉ.सुनिल गायकवाड, कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, माजी मंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिलीपराव देशमुख, माजी महापौर दिपक सुळ, विक्रांत गोजमगुंडे यांनी प्रत्यक्ष उपोषण स्थळी भेट देऊन जाहीर पाठींबा दिला होता. तर ६२ सामाजिक संघटना, संस्था यांनी उपोषणास समर्थन असल्याचे पत्र दिले होते. उपोषणाच्या ६ व्या दिवशी शासनाचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून तहसिलदार सौदागर तांदळे, जिल्हाधिकारी वर्षा घुगे ठाकूर, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यु पवार यांनी एका महिन्यात हा प्रश्र्न सोडविला जाईल असे आश्वासन दिले आणि उपोषण तात्पुरते स्थगित करण्याची विनंती उपोषणकर्त्यांना केली. त्यानुसार ७ ऑक्टोबर २०२३ रोजी माझं लातूर परिवाराने उपोषण तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतला. आंदोलनाचाच भाग म्हणून १९ ऑक्टोबर २०२३ रोजी मुंबई येथे मंत्रालयात जाऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री गिरीष महाजन, आरोग्यमंत्री तानाजी सावंत, उद्योगमंत्री उदय सामंत, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले. ...पान ६ वर

# भिवंडीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा कार्यकर्ता मेळावा

**भिवंडी/प्रतिनिधी**




आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भिवंडी लोकसभेत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष ऍक्टिव्ह मोडवर आला असून कार्यकर्त्यामध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी राष्ट्रवादीचा भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदार संघ कार्यकर्ता मेळावा भादवड येथील छ.शिवाजी महाराज क्रीडांगणात बुधवारी सायंकाळी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी प्रदेश प्रवक्ते महेश तपासे, लोकसभा प्रभारी बाळ्या मामा म्हात्रे, शहापूरचे माजी आमदार पांडुरंग बरोरा, युवा नेते सुमित म्हात्रे, ठाणे जिल्हा महिलाध्यक्षा डॉ.रुपाली कराळे, माजी जिप सदस्या शारदा म्हात्रे, पुण्याचे अक्षय भोसले, तालुकाध्यक्ष गणेश गुळवी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते व महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपने लोकसभा उमेदवारांची पहिली यादी प्रसिद्ध केली. मात्र या यादीत महाराष्ट्रातील एकही खासदारांचे नाव नाही, कारण त्यांना माहित आहे महाराष्ट्र गद्दारी सहन करणार नाही म्हणून भाजपच्या राज्यातील एकही मंत्र्यांचे नाव पहिल्या निवडणूक यादीत नाही अशी टिका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ते महेश तपासे यांनी यावेळी केली. भिवंडीचे खासदार कपिल पाटील हे देशात सर्वात नाकर्ते खासदार असून लोकसभेसाठी केंद्राची एकही योजना दहा वर्षात पूर्णत्वास नेली नाही जी कामे आमदार व जिल्हा परिषद सदस्यांनी पाठपुरावा करून मजूर केले आहेत त्यांची उदघाटन करण्याची कामे पाटील करत आहेत अशी टीका बाळ्या मामा म्हात्रे यांनी यावेळी केली. अजित दादा जेव्हा विरोधी पक्षात होते तेव्हा गॅस सिलेंडर दर वाढ झाली किंवा महागाईवर दादा नेहमीच भाजप वर टीका करायचे आता दादाच कमळाबाईच्या कडेवर जाऊन बसले आहेत. मी आमदार असतांना शहापूर मतदार संघात ३५० कोटींची कामे मंजूर केली मात्र त्याचे श्रेय खासदार कपिल पाटील घेत आहेत हे दुर्दैवी आहे अशी टीका शहापुरचे माजी आमदार पांडुरंग बरोरा यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मनेष म्हात्रे तर आभार सुयश सोनावणे यांनी व्यक्त केले.

# रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ लातूर अस्पिरेशनतर्फे 'गोष्ट सर्वायकल कॅन्सर' या विषयावर व्याख्यान!



**लातूर/प्रतिनिधी**

गर्भाशयाच्या ग्रीवेचा कर्करोग आणि प्रतिबंध या विषयवार 'गोष्ट सर्वायकल कॅन्सरची' या महितीप्रद व्याख्यानाचे आयोजन रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ लातूर अस्पिरेशनच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमात लातूर शहरातील प्रख्यात स्त्रीरोग तज्ञ डॉ. स्नेहल देशमुख आणि डॉ. वैशाली दाताळ यांनी उपस्थित महिलांना कर्करोगाची कारणे, लक्षणे आणि उपचार याबद्दल सखोल आणि सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. या प्रसंगी त्यांनी मुलींमध्ये घेण्याची लस आणि त्याची परिणामकारकता याबद्दल माहिती दिली. याप्रसंगी क्लबच्या वतीने जगतिक महिला दिनानिमित्त ज्योती राजेमाने (योग प्रशिक्षक), श्रुती मुंदडा (केक मेकर), माधुरी वलसे (आदर्श शिक्षिका) आणि रजनी वैद्य (हस्त कला प्रशिक्षक) या समाजातील विविध क्षेत्रातील कर्तृत्वान महिलांचा देखील सन्मान करण्यात आला. उपस्थित महिलांना पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांची भेट देण्यात आली आणि प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन ...पान ६ वर

# चित्रकलेला भाषेचे बंधन नाही -पुरुषोत्तम बेर्डे

**विरार/प्रतिनिधी**



मराठी भाषा ही अनेक शब्दांना सामावून घेणारी आहे. भाषा ही दर मैलावर बदलत राहते. आज आपण ज्ञानेश्वरांची मराठी भाषा बोलत नाही, तर आताच्या साहित्यिकांची, शिरवाडकरांची मराठी बोलतो. आपल्याला आपल्या भाषेचा अभिमान असायला हवा. त्यासाठी वाचन करायला हवे. मराठीमध्ये समृद्ध असे साहित्य आहे, ते वाचल्याने आपल्या ज्ञानात भर पडेल. यासाठीच आपली भाषा ही जपायला हवी, चित्रकलेला भाषेचे बंधन नाही असे प्रतिपादन नाट्य दिग्दर्शक, निर्माता आणि लेखक पुरुषोत्तम बेर्डे यांनी केले. विरार येथील विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट संचालित विवा इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाईड आर्ट या कला महाविद्यालयाच्या १३व्या वार्षिक कला प्रदर्शन उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. आजच्याच दिवशी २७ फेब्रुवारी १९८३ साली पहिले व्यावसायिक नाटक टूर टूर ला ४१ वर्षे पूर्ण झाली. मी ह्या कलेला वाहून घेतलेल्या संस्थेमध्ये रमलो आणि मला माझे महाविद्यालयीन दिवस आठवले असे म्हणत नाटकाच्या आठवणींना आणि महाविद्यालयीन जीवनातील गंमतीशीर किस्से सांगत बेर्डे ह्यांनी आठवणींना उजाळा दिला. मराठी भाषा गौरव दिन व १३ व्या वार्षिक कला प्रदर्शनाचे उदघाटन हा योगायोग जुळून आल्याने, महाविद्यालयाच्या आवारात 'सन्मान मराठी भाषेचा' या संकल्पनेवर विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने उत्कृष्ट चित्रे, वेगवेगळ्या पद्धतीने मराठी भाषेचा वापर, भाषेची उत्पत्ती, रूपरेषा, सजावट, देखावे अशा संकल्पनेद्वारे मराठी भाषा गौरव दिन कला प्रदर्शनातून साजरा करण्यात आला. विवा इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट दरवर्षी एका मनस्वी चित्रकाराला सन्मानपत्र देऊन आदराने सन्मानित करत असते. या वर्षीचा विवा इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाईड आर्ट हा पुरस्कार दिवंगत चित्रकार अब्दुल अजीज रायबा यांना देण्यात आला. रायबा यांचे पुत्र नजीब रायबा व त्यांची मुलगी हसिबा सरनाईक यांनी हा पुरस्कार स्वीकारला. विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त ...पान ६ वर

# विचार, दिशा आणि दृष्टी ही देणगी साहित्याने दिली -डॉ.जयद्रथ जाधव




**लातूर/प्रतिनिधी**

व्यक्ती, समाज व समाजाची स्थिती गती साहित्याने समजून येते. दिशा, दृष्टी, विचार आणि जीवन मूल्येविचार ही देणगी साहित्यानी दिली असे प्रतिपादन डॉ.जयद्रथ जाधव यांनी केले. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र शासन आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय लातूर यांनी लातूर ग्रंथोत्सव २०२३ आयोजित करण्यात आला होता. ग्रंथोत्सावाच्या दुसऱ्या दिवशी 'साहित्याने मला काय दिले' या परिसंवादात अध्यक्ष म्हणून जाधव बोलत होते. या परिसंवादात अनंत कदम, उदगीर व मोहिब कादरी, ...पान ६ वर

# लातूरच्या लिंगायत समाजाच्या आगळ्या वेगळ्या सत्काराने भारावून गेलो -आ.जयंत पाटील

**लातूर/प्रतिनिधी**




आपल्या प्रदीर्घ राजकीय जीवनात आपण अनेक सत्कार सोहळे पाहिले, सोहळ्यांना आवर्जून उपस्थित राहिलो. पण समस्त लातूर जिल्हा लिंगायत समाजाच्या आगळ्यावेगळ्या सत्काराने भारावून गेल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी केले. समस्त लिंगायत समाजाच्या वतीने शुक्रवारी लातूरच्या दौऱ्यावर आलेल्या आ.जयंत पाटील यांचा भव्य सत्कार सोहळा लिंगायत समाजातील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्व असणाऱ्या उदयकुमार चौंडे यांच्या औसा रोडवरील 'जगन्नाथ' निवासस्थानी आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील नागराळकर, माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील, राष्ट्रवादीचे नूतन जिल्हाध्यक्ष संजय शेटे, उदयकुमार चौंडे यांसह लिंगायत समाजातील विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या सत्कार सोहळ्यात आ. जयंत पाटील यांना महात्मा बसवेश्र्वरांची प्रतिमा, वचनसाहित्य देऊन बसवण्णांच्या वचनांचा मंत्रघोष करत लिंगायत पद्धतीने पुष्पवृष्टी करून त्यांचा सन्मान करण्यात आला. हा सन्मान सोहळा संपन्न होत असताना टाळ्यांच्या गजरांनी संपूर्ण सभामंडप दणाणून गेला होता. हा सोहळा पूर्णतः राजकारण विरहित, स्नेहमिलन प्रकारचा होता. सोहळ्याला लिंगायत समाजातील विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, उद्योग, व्यापार क्षेत्रात कार्यरत असणारे अनेक मान्यवर आवर्जून उपस्थित होते. या सोहळ्याने लिंगायत समाजाची एकता सर्वांना पहायला-अनुभवायला मिळाली.या सत्कार सोहळ्याला उत्तर देताना आ. जयंत पाटील यांनी आपण अक्षरशः भारावून गेल्याचे सांगितले. लिंगायत समाजाचे अल्पसंख्यांक दर्जा, स्वतंत्र धर्म मान्यतेसह विविध प्रश्न अद्यापही प्रलंबित आहेत. त्याची सोडवणूक करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत, पण तोपर्यंत लिंगायत समाजाने थोडी कळ सोसावी असे ते म्हणाले. विधानसभा निवडणुकीत राज्यात महाविकास आघाडीचे सरकार निश्चित येणार आहे. आपले सरकार आल्याबरोबर या प्रश्नांची सोडवणूक केली जाईल. महात्मा बसवेश्र्वरांनी संपूर्ण जगाला दिशा दाखविण्याचे महान कार्य केले आहे. सन १९९० साली मला स्वतःला उमेदवारी मिळवून देण्यासाठी ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांनी मोलाची मदत केली होती. माझी राजीव गांधींशी भेट घालून देऊन त्यांनी मला विधानसभेचे तिकीट मिळवून दिल्याची आठवणही आ. पाटील यांनी काढली. नूतन जिल्हाध्यक्ष संजय शेटे उत्तम कार्य करतील असा आपल्याला विश्र्वास असल्याचे त्यांनी बोलून दाखविले. संजय शेटे यांनी यावेळी बोलताना समाजाची शक्ती पाठीशी ...पान ६ वर

# भिवंडी तालुक्यातील ज्येष्ठ नागरिकांना अन्न धान्य वाटप

**भिवंडी/प्रतिनिधी**



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या आदिवासी कक्ष ठाणे जिल्हा ग्रामीण कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र शासनाचे आदिवासी सेवक पुरस्कार सन्मानित महादेव घाटाळ यांनी नुकताच भिनार येथे आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांकरता अन्नधान्य साहित्यांचे वितरण केले आहे. भिवंडी तालुक्यातील मौजे पोगाव कोन, पडघे, महापोली, कांबे, ...पान ६ वर

